दैनिक

# समर्थ राजयोग

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ६ वे | अंक -१२३ | बुधवार दि.०७ जानेवारी २०२६ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४

Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-123 | Wednesday, Dt.07 January 2026 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# बीडमध्ये दिवसाढवळ्या थरार; तरुणाची गोळ्या झाडून आणि शस्त्राने वार करुन निर्घृण हत्या

**बीड : गेल्या काही दिवसांपासून शांत असलेल्या बीड शहरात आज दुपारी पुन्हा एकदा रक्ताचा सडा पडला. शहरातील अंकुश नगर भागात एका ३८ वर्षीय तरुणाची अज्ञात हल्लेखोरांनी अत्यंत निर्घृणपणे हत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेमुळे संपूर्ण शहरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हर्षद शिंदे (वय ३८, रा. धानोरा रोड, हाउसिंग कॉलनी, बीड) हा तरुण बीड नगरपालिकेत प्लंबिंगचे काम करत होता. आज दुपारी २ वाजण्याच्या सुमारास तो अंकुश नगर येथील शिवाजीनगर रोडवर आपल्या कामात व्यस्त होता. यावेळी दबा धरून बसलेल्या अज्ञात हल्लेखोरांनी त्याच्यावर अचानक हल्ला चढवला.**

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, हल्लेखोरांनी सुरुवातीला हर्षदवर दोन गोळ्या झाडल्या. गोळीबाराच्या आवाजाने परिसरात एकच धावपळ उडाली. जखमी अवस्थेत स्वतःचा जीव वाचवण्यासाठी हर्षद जवळच असलेल्या एका पत्र्याच्या शेडच्या मागे धावत गेला. मात्र, हल्लेखोराने त्याचा पाठलाग सोडला नाही. त्या ठिकाणी त्याला गाठून हल्लेखोराने धारदार शस्त्राने त्याच्यावर सपासप वार केले. या भीषण हल्ल्यात हर्षद जागीच रक्ताच्या थारोळ्यात पडला आणि त्याचा मृत्यू झाला.

तपासासाठी फॉरेन्सिक टीम पाचारण

हत्येचा हा प्रकार अत्यंत नियोजित वाटत असल्याने पुराव्यांची जुळवाजुळव करण्यासाठी फॉरेन्सिक पथकाला पाचारण करण्यात आले होते. फॉरेन्सिक टीमने घटनास्थळावरून रक्ताचे नमुने, गोळ्यांच्या पुंगळ्या आणि इतर तांत्रिक पुरावे गोळा केले आहेत.



### पोलीस प्रशासनाची धाव

घटनेची माहिती मिळताच शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले. घटनेचे गांभीर्य ओळखून बीडचे अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, पोलीस उपाधीक्षक पूजा पवार, आणि पोलीस निरीक्षक बांगर यांनी तातडीने घटनास्थळाची पाहणी केली. खबरदारीचा उपाय म्हणून परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

### हत्येचे कारण अस्पष्ट

हर्षद शिंदे याची हत्या कोणी केली आणि त्यामागे नेमका काय उद्देश होता, हे अद्याप स्पष्ट होऊ शकलेले नाही. जुन्या वादातून ही हत्या झाली की यामागे काही वेगळे आर्थिक किंवा वैयक्तिक कारण आहे, याचा तपास पोलीस करत आहेत. दिवसाढवळ्या वर्दळीच्या ठिकाणी अशा प्रकारे गोळीबार आणि हत्या झाल्याने बीडमधील कायदा व सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. सध्या शिवाजीनगर पोलीस संशयितांचा शोध घेत असून, परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्याचे काम सुरू आहे. या घटनेमुळे मृताच्या कुटुंबावर शोककळा पसरली असून परिसरात तणावपूर्ण शांतता आहे.

# जातीय द्वेषातून रा.प. अधिकाऱ्याकडून सातत्याने छळ

**मागासवर्गीय असल्यामुळेच माझ्यावर वरिष्ठ अधिकारी निलेश पवार यांच्याकडून अन्याय - वाहतूक निरीक्षक भिमकिरण बनसोडे**

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बीड आगारात कार्यरत असलेले वाहतूक निरीक्षक भिमकिरण विनायक बनसोडे यांनी वरिष्ठ अधिकारी निलेश पवार यांच्यावर जातीय भावनेतून मानसिक, प्रशासकीय व वैयक्तिक छळ केल्याचा गंभीर तक्रार करत रा .प. प्रशासनाकडुन न्याय देण्यात यावा मागणी केली आहे. मागासवर्गीय समाजातील असल्यामुळेच आपल्यावर अन्याय केला जात असल्याचा थेट तक्रार त्यांनी केली आहे.

बनसोडे हे मागील दोन वर्षांपासून बीड आगारात प्रामाणिकपणे सेवा बजावत असताना, सन २०२२-२३ या कालावधीत तत्कालीन आगार व्यवस्थापक निलेश पवार यांनी जाणीवपूर्वक खराब सी.आर. लिहून बढती रोखण्याचा प्रयत्न केला अशी तक्रार त्यांनी केली. सहाय्यक वाहतूक अधिक्षक पदाची परीक्षा उत्तीर्ण होऊन आणि प्रतिक्षा यादीत नाव असतानाही जातीय आकसातून बढतीपासून वंचित ठेवण्याचा प्रयत्न वरीष्ठ अधिकारी श्री निलेश पवार करीत आहेत.यानंतर निलेश पवार यांची बदली विभागीय कार्यशाळेत ओ.एम.ई. म्हणून झाली. मात्र तेथे असतानाही त्यांना कर्मचारी वर्ग अधिकारी (डीपीओ) पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आणि त्या अधिकाराचा गैरवापर करून बनसोडे यांची बीड आगारातून धारूर आगारात नियमबाह्य बदली करण्यात आली, होती. तेव्हापासून सतत मानसिक व प्रशासकीय त्रास देण्याचे प्रकार सुरू असल्याचे माहिती मिळते

दरम्यान, दि. ०८ ऑक्टोबर २०२५ रोजी कुमशी (शाळा) कर्तव्यावर असलेल्या बसला मागून कारची धडक बसली होती. या घटनेत बसचे किरकोळ नुकसान झाले असून नुकसानभरपाई ५ हजार रुपये संबंधित वाहन मालकाकडून तात्काळ वसूल करून बस दुरुस्त करण्यात आली. त्याच दिवशी बस पुन्हा मार्गावर सोडण्यात आली व तब्बल दोन महिन्यांहून अधिक काळ ती नियमितपणे चालू होती.मात्र, दोन

(उर्वरीत पान २ वर)

# रोजगार हमी योजनेला गती; लाभार्थ्यांना दिलासा

आष्टी (प्रतिनिधी)

मतदारसंघातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत (नरेगा) सुरू असलेल्या व प्रलंबित विकासकामांचा सविस्तर आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात आ. सुरेश धस यांच्या उपस्थितीत मॅरेथॉन बैठक पार पडली. या बैठकीत जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

पंचायत समिती आष्टी, पाटोदा व शिरूर (कासार) अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या सार्वजनिक तसेच वैयक्तिक लाभाच्या कामांबाबत या बैठकीत सखोल चर्चा करण्यात आली. पाणंद रस्ते, शेत पाणंद, खडीकरण, जलसिंचन विहिरी, शेततळे, गायगोठे, शेळीशेड, घरकुल आदी कामांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला.

अनेक ठिकाणी कामे पूर्ण होऊनही मजूर हजेरी, मस्टर जनरेशन, कुशल बिले व तांत्रिक त्रुटींमुळे देयके प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले. या सर्व प्रकरणांचा तातडीने निपटारा करण्याचे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी व मुख्य

(उर्वरीत पान २ वर)



**आ.सुरेश धस यांची जिल्हाधिकाऱ्यासोबत मॅरेथॉन बैठक संपन्न**

# चंदन तस्करांवर मोठी कारवाई; लाखोंचा ऐवज जप्त



परळी / प्रतिनिधी

परळी ग्रामीण पोलिसांच्या नाकावर टिच्चून उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या पथकाने सापळा रचून धर्मापुरी-पानगाव रोडवर असलेल्या शिवारात धाडशी कारवाई करत लाखो रुपयांचा चंदन आणि ऐवज जप्त करत सात चंदन तस्करांला गजाआड केल्याची घटना घडली. या प्रकरणी परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सूत्राकडून

(उर्वरीत पान २ वर)

# महिला प्राध्यापिकेचा स्वतःला पेटवून घेत आत्महत्येचा प्रयत्न, प्रकृती चिंताजनक



अंबाजोगाई (प्रतिनिधी)

अंबाजोगाई: येथील एका नामवंत महाविद्यालयात कार्यरत असलेल्या महिला प्राध्यापिका डॉ. ममता राठी (जाखोटिया) यांनी रविवारी दुपारी जवळगाव शिवारात स्वतःला पेटवून घेत आत्महत्येचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या भीषण घटनेत त्या ८० टक्क्यांहून अधिक भाजल्या असून त्यांची प्रकृती अत्यंत गंभीर आहे. शैक्षणिक क्षेत्रात मोठी खळबळ उडवून देणाऱ्या या घटनेची माहिती मिळताच बर्दापूर पोलिसांनी सोमवारी

(उर्वरीत पान २ वर)

# एक हात मदतीचा डोंगराच्या वाडी येथील ऊसतोड कामगाराच्या कुटुंबाला शिवसेनेची आर्थिक मदत



वडवणी ।प्रतिनिधी

डोंगराचीवाडी ता. वडवणी जिल्हा बीड येथील भूमिपुत्र गणेश नामदेव डोंगरे (वय ३१) या तरुण ऊसतोड कामगाराचा पश्चिम महाराष्ट्रातील उमरगा येथील बिराजदार साखर कारखान्यावर काम करत असताना दुर्दैवी अपघातात मृत्यू झाला. उसाचा ट्रॅक्टर काट्यावर नंबर लावलेला असताना अचानक पुढील वाहनाने धक्का दिल्याने उसासह ट्रॅक्टर त्यांच्या अंगावर पडला. या भीषण अपघातात गणेश डोंगरे यांचा जागीच मृत्यू झाला.

या घटनेनंतर आज वडवणी तालुका शिवसेनेच्या वतीने

(उर्वरीत पान २ वर)

# शिरूर कासार तहसिल वर शेतकऱ्यांचा आक्रोश



**खांद्यावर जू आणि तुरीचा भारा घेऊन सोपान काका मोरे यांचे निदर्शने**

मानूर ।प्रतिनिधी

शिरूर कासार तालुक्यातील शेतकऱ्यांची होणारी आर्थिक लूट थांबवण्यासाठी आणि तूर, कापूस, गहू, हरभरा यांसारख्या पिकांची शासकीय

(उर्वरीत पान २ वर)



**बीड - मराठीतील प्रथम वृत्तपत्र असलेल्या दर्पणच्या स्थापना दिनानिमित्त आज येथील जिल्हा माहिती कार्यालयात दर्पण दिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. येथील जिल्हा माहिती कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमात दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून स्थानिक पत्रकारांच्या उपस्थितीत अभिवादनाचा कार्यक्रम घेण्यात आला.**

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!

Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन

दहिवाळ
सुवर्णकार

नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर,
सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777

शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

6 x 6.5

दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG

बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA )

संपादकीय

बुधवार दि.०७ जानेवारी २०२६
WEDNESDAY, DT.07 JANUARY 2026



संपादकीय....

# महाराष्ट्रधर्म टिकवण्याची शेवटची संधी!

मुंबई महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मराठी भाषा, संस्कृती आणि मराठी माणसाच्या हक्कांवर पुन्हा एकदा निर्णायक संघर्ष उभा राहिला आहे. या लेखातून 'मराठीनामा'च्या निमित्ताने महाराष्ट्रधर्म टिकवण्यासाठीची दिशा स्पष्ट केली आहे.

मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत उतरलेले सर्वच प्रमुख दावेदार पक्ष यावेळी, 'मुंबईचा महापौर मराठीच होणार' असं स्वतःहून सांगत आहेत. हिंदीसक्तीच्या विरोधात सुरू झालेले मराठी भाषाभिमानी आंदोलन गेले काही महिने क्रमाक्रमाने प्रभावी बनत गेल्याचा हा परिणाम आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) व महाराष्ट्र नवनिर्माण सेना हे त्यांच्या जन्मापासूनच मराठीच्या वापराबाबत आग्रही आहेत. त्या पक्षांचा मराठीबाबतचा आग्रह सर्वांना परिचित आहे. शिंदे सेनेला त्यांच्या दिल्लीतील सत्ताधाऱ्यांच्या कृपेने अजूनही न्यायालयीन संरक्षण मिळाले असल्याने, ते जरी स्वतःला शिवसेना म्हणवून घेत असले तरी त्यांची ज्या भारतीय जनता पक्षासोबत युती आहे त्यांच्या तालावरच त्यांना कदमताल करावा लागत आहे आणि लागणार आहे. त्यामुळे जनरेट्यामुळे जरी ते मराठीबाबत बोलत असले तरी अखेर भाजप ठरवणार तेच त्यांना करावे लागणार. भाजप केवळ काँग्रेससारखा राष्ट्रीय पक्ष आहे म्हणून नाही, तर त्यांची जननी असणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला, देशभरात व हिंदू धर्मात असलेली व्यापकता आणि बहुविविधता मान्य नाही. त्यामुळे एक राष्ट्र, एक धर्म, एक भाषा असे म्हणत देशभर हिंदी भाषा प्रचलित करणे हा त्यांच्या सांस्कृतिक राजकारणाचा पाया आहे. त्यामुळे भाजपची भूमिका हिंदीवादीच असणार, हे मुंबईकरांनी लक्षात ठेवावे! भाजपमध्ये मूळ संघ दक्ष नेत्यांपेक्षा सध्या आयारामांचा अधिक बोलबाला आहे. हे बाहेरून आलेले शिलेदार संघ भाजपची भाषा अधिक आक्रमकतेने मांडून आपणच खरे स्वामीभक्त, असे ठसवण्याची संधी साधत असतात. अशा ना. नीलेश राणे वा कृपाशंकर सिंह यांच्या मुखाने संघनीती पेरत राहणे राज्यातील भाजप नेत्यांना सहज सुकर बनले आहे. मुंबईतील मेट्रो बांधणीत राज्य सरकारने कॉर्पोरेट कंपन्यांपुढे लोटांगण घातले. मेट्रो स्थानकांची नावे नक्की करताना मुंबईचा इतिहास, परंपरा, धार्मिक आणि सामाजिक मानबिंदू या सगळ्या बाबी शासनाने सहजपणे गुंडाळून ठेवल्या.

या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र दिनी मराठी अभ्यास केंद्राच्या पुढाकाराने व समविचारी संस्था-संघटनांच्या सहकार्याने राज्य सरकारच्या पहिलीपासून हिंदी सक्ती विरोधातल्या पत्रकार परिषदेने राज्याच्या राजधानीत मराठीचे बिगुल पुन्हा वाजवण्यात आले. संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात १०७ हुतात्म्यांची शहादत देत १९६० साली मुंबईसह महाराष्ट्र राज्य मिळवत असताना, मुंबईत मराठीचा एल्गार दुमदुमला होता. मात्र मुंबई महापालिकेत इंग्रजीचाच बोलबाला होता. त्याविरोधात पहिला आवाज उठवला- कर्नाटकातून नोकरीच्या शोधात मुंबईत आलेल्या जॉर्ज फर्नांडिस यांनी! १९६३ साली जॉर्ज महापालिकेत नगरसेवक म्हणून प्रथम निवडून गेले. महापालिकेच्या सभेत त्यावेळी महापौर जेव्हा इंग्रजीत भाषण करू लागले तेव्हा जॉर्ज फर्नांडिस आणि त्यांचे समाजवादी साथी उभे राहून त्यांनी महाराष्ट्र राज्याच्या राजधानीच्या शहरातील महापालिकेत, मराठीतच बोलले पाहिजे, सर्व व्यवहार मराठीतच झाले पाहिजेत, असा आग्रह धरला. त्याच्यानंतर १९६६ साली शिवसेनेचा जन्म झाला. मराठीच्या सन्मानाचा मुद्दा त्यांनी लावून धरला. राजकारणाच्या ओघात पुढे शिवसेना भाजपसोबत गेली व मराठीचा मुद्दा मागे पडला. मुंबईतल्या जमिनी बिल्डरांच्या घशात जाऊ देत मराठी कामगार काम करत असलेल्या गिरण्या आधी बंद झाल्या. मग गिरणी कामगार बेघर झाला आणि मुंबईतून मराठी हद्दपार होण्याच्या कड्यावर येऊन ठेपली. भाषा ही केवळ संवाद माध्यम नसून संस्कृती, परंपरा, आपुलकी आणि बांधिलकीची वाहक असते. देशातील अन्य राज्यात जनतेने आपापल्या भाषांचा वापर सहजभावाने टिकवून ठेवत हे दाखवून दिले आहे. त्यामुळेच मुंबईत मराठी भाषा, शाळा आणि मराठी माणसाच्या हक्कांसाठी सुरू झालेला लढा, महाराष्ट्रधर्मावर आधारित मराठीकरणाकडे जात आहे. आगामी निवडणुकांच्या काळात हा लढा अधिक प्रभावीपणे पुढे नेण्यासाठी, प्रकाशित करण्यात आलेला पुढील जाहीरनामा फार महत्त्वाचा आहे.

महानगरपालिकेसाठी मराठीनामा

जाहीरनाम्यात म्हटले आहे की, 'राजकीय पक्ष आणि धर्म कोणताही असो, मराठी उमेदवारालाच प्राधान्य द्या. जिथे एकापेक्षा जास्त मराठी उमेदवार आहेत तिथे मराठी शाळा, भाषा, मराठी माणूस आणि महाराष्ट्राची संस्कृती याला महत्त्व देणाऱ्या उमेदवाराला प्राधान्य द्या. सार्वजनिक ठिकाणी मराठी नीट बोलू शकणाऱ्या उमेदवारालाच पसंती द्या. निवडणुकीचा प्रचार, प्रसार मराठीतून करणाऱ्या उमेदवारालाच प्राधान्य द्या. स्थलांतरितांसाठी महाराष्ट्राची भाषिक, सांस्कृतिक ओळख पुसून टाकणाऱ्या मराठी/अमराठी उमेदवाराला नाकारा.

महानगरपालिका प्रशासनासंदर्भात मागण्या आहेत, 'महापौरांसह सर्व समित्यांचे अध्यक्ष मराठीच हवेत. महानगरपालिकेच्या संकेतस्थळासह पालिकेचे सर्व प्रकारचे आर्थिक आणि प्रशासकीय व्यवहार, खरेदी आदेश, पावत्या मराठी भाषेतच उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. महानगरपालिका हद्दीतील दुकानांच्या पाट्या मराठीत नसणाऱ्या दुकानदारांवर कठोर आणि तातडीने दंड वसूल करावा. अंमलबजावणीत हयगय करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. मांसाहारावरून घरे नाकारणाऱ्या संस्थेच्या निवासी इमारती अनधिकृत ठरवून त्यांचे पाणी, वीज तत्काळ कापून टाकावे, तसेच ओसी आणि अग्निरोध प्रतिबंधक प्रमाणपत्र रद्द करावे.

महानगरपालिका हद्दीतील रस्ते, चौक, बागा, क्रीडांगणे, मैदाने यांना मराठी व्यक्ती, मराठी संस्कृती यांच्या प्रतीकांची नावे द्यावीत. महानगरपालिका हद्दीतील मराठी भाषेवरील अन्यायाची तक्रार नोंदविण्यासाठी प्रभागनिहाय 'मराठी दक्षता केंद्र' उपलब्ध करून द्यावी. विधिमंडळ राजभाषा समितीच्या धर्तीवर महानगरपालिकेचे कामकाज मराठीतून होते की नाही यावर लक्ष ठेवण्यासाठी मनपा राजभाषा समिती स्थापन करावी. मुंबई शहराचे 'मराठीपण' सार्वजनिक ठिकाणी दृश्यमान होईल यासाठी विशेष प्रयत्न करावेत. रस्ते, सार्वजनिक इस्पितळे, वाहतूक व्यवस्था, उद्याने, नाटक व चित्रपटगृहे, सभागृहे इ. ठिकाणी मराठीचा वापर प्राधान्याने व ठळकपणे झाला पाहिजे. अमराठी लोकांना मराठी भाषा शिकविण्यासाठी प्रभागनिहाय ऑफलाइन तसेच ऑनलाइन केंद्रे सुरू करावीत.

महानगरपालिकेतील संधी आणि प्राधान्य

स्थानिक स्तरावरील रोजगारासंदर्भात मराठीनामा म्हणतो, 'महापालिकेतील किमान ८० टक्के कंत्राटे मराठी भूमिपुत्र आणि भूमिकन्यांनाच मिळायला हवीत. महापालिकेच्या नोकरभरतीत ८० टक्के प्राधान्य मराठी माध्यमातून शिक्षण घेतलेल्या उमेदवारांना मिळायला हवे. फेरीवाला ओळखपत्र देताना ८० टक्के प्राधान्य मराठी भूमिपुत्र आणि भूमिकन्यांनाच मिळायला हवे. महानगरपालिका हद्दीत व्यवसायासाठी परवाना देताना ८० टक्के प्राधान्य मराठी भूमिपुत्र आणि भूमिकन्यांनाच द्यावे. परराज्यीय नागरिकांना व्यवसाय परवाना देताना स्थानिक मराठी भूमिपुत्र आणि भूमिकन्या यांच्या सहभागीदारीची अट घालावी. परराज्यीय नागरिकांना महापालिकेच्या हद्दीत व्यवसाय, धंद्यांसाठी परवाने देताना मराठी भाषेची परीक्षा उत्तीर्ण करणे बंधनकारक करावे.

# बालझुंबड - प्रश्न मंजुषा (क्विझ कॉम्पिटेशन) स्पर्धेत विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

## वाचनसंस्कृती रूजविण्यासाठी बालझुंबड सारखे उपक्रम उपयुक्त ठरतात - प्रशांत बर्दापूरकर

बालझुंबडमधून विद्यार्थ्यांची एकाग्रता, आत्मविश्वास, कल्पनाशक्ती आणि लेखन कौशल्य यांचा विकास होतो - डी.डी.गोडसे

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

प्रियदर्शनी क्रीडा, सांस्कृतिक व व्यायाम मंडळाच्या वतीने प्रति वर्षाप्रमाणे यावर्षीही सलग २६ व्या बालझुंबड मधील प्रश्न मंजुषा (क्विझ कॉम्पिटेशन) स्पर्धा मंगळवार, दिनांक ०६ जानेवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आली होती. संयोजक तथा मंडळाचे अध्यक्ष राजकिशोर मोदी, सांस्कृतिक विभागप्रमुख दिनकर जोशी व बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्यकारी संचालक संकेत मोदी यांच्या संकल्पनेतून आयोजित प्रश्न मंजुषा (क्विझ कॉम्पिटेशन) स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डी.डी.गोडसे (विभागप्रमुख, योगेश्वरी प्राथमिक विद्यालय, मेडिकल परिसर) हे तर प्रमुख अतिथी म्हणून पत्रकार प्रशांत बर्दापूरकर, प्राचार्य डॉ.तरके, प्राचार्य प्रशांत कुमार (न्यु व्हिजन पब्लिक स्कूल, अंबाजोगाई) आदींची प्रमुख उपस्थिती होती. पुज्य सानेगुरूजी यांच्या प्रतिमेचे पुजन, दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख मान्यवरांचा सत्कार संयोजक समितीच्या वतीने करण्यात आला. यावेळी बोलताना प्रमुख अतिथी पत्रकार प्रशांत बर्दापूरकर म्हणाले की, बालझुंबड हे व्यासपीठ विद्यार्थ्यांचे आवडते आहे. यातून साहित्य, कला आणि विज्ञान यांची सांगड घातली आहे. बालझुंबड मधून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना प्रोत्साहन मिळते. व्यक्तीमत्व विकास होतो. या स्पर्धेची व्यापकता तालुकास्तरीय आहे. स्पर्धा आवश्यक आहे. फक्त अभ्यास एके अभ्यासच नको तर विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभागी झाले पाहिजे. वाचनसंस्कृती रूजविण्यासाठी बालझुंबड सारख्या स्पर्धा उपयुक्त ठरतात. विद्यार्थ्यांनी कथा, कविता व कादंबरी वाचन केले पाहिजे. सामान्यज्ञान प्राप्त केले पाहिजे. ज्ञान संपादन केले पाहिजे असे सांगून प्रश्नमंजुषा स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. व बालझुंबड स्पर्धेच्या सातत्यपूर्ण आयोजनाबद्दल संयोजक राजकिशोर मोदी, सांस्कृतिक विभागप्रमुख



दिनकर जोशी, कार्यकारी संचालक संकेत मोदी यांचे पत्रकार बर्दापूरकर यांनी कौतुक केले. अध्यक्षीय समारोप करताना डी.डी.गोडसे म्हणाले की, मागील २५ वर्षांपासून अव्याहतपणे सुरू असलेल्या बालझुंबडच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना एक सशक्त व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. विद्यार्थ्यांचे व्यक्तीमत्व विकास घडवून आणणे, प्रगतीसाठी हा उपक्रम खूप महत्त्वाचा आहे. प्रश्नमंजुषा सारख्या स्पर्धेतून विद्यार्थ्यांमध्ये एकाग्रता, आत्मविश्वास, कल्पनाशक्ती आणि लेखन कौशल्य यांचा विकास होतो. आमच्या काळात ज्ञान संपादन करण्यासाठी पुस्तके आणि वर्तमानपत्रे ही केवळ दोनच साधने उपलब्ध होती आजच्या काळात विज्ञानाने प्रगती केली आहे. आधुनिक युगात विपुल साधने उपलब्ध झाली आहेत. मोबाईलमुळे कर लो दुनिया मुठ्ठी में अशी परिस्थिती आहे. तेव्हा आजच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी नेहमीच जागरूक, सतर्क राहावे. ज्ञानाचा फायदा होतो. तेव्हा विद्यार्थ्यांनी ज्ञान संपन्न व्हावे असे आवाहन करून गोडसे यांनी प्रश्न मंजुषा स्पर्धेतील सहभागी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. प्रारंभी क्विझ कॉम्पिटेशन स्पर्धेसंदर्भात अधिक माहिती देताना समन्वयक राजेश कांबळे यांनी सांगितले की, क्विझ कॉम्पिटेशन ही स्पर्धा दोन गटात घेण्यात येईल. ही स्पर्धा पुढीलप्रमाणे घेण्यात येईल. यामध्ये सर्वप्रथम आलेल्या सर्व स्पर्धकाची त्यांच्या शालेय अभ्यासक्रमानुसार लेखी परीक्षा ओ.एम.आर. शीट वर घेण्यात येईल. यामधून पहिल्या सहा संघांना निवडून त्यांच्यामध्ये पुढील स्पर्धा घेतली जाईल. यामध्ये सर्वप्रथम सर्व विषयांचे पर्यायांसह प्रश्न विचारले जातील. हे सर्व प्रश्न संघांना मोठ्या पडद्यावर पर्यायांसह दिसतील व ठराविक वेळेतच त्यांना यांचे उत्तर देणे आवश्यक आहे. त्यानंतर दुसऱ्या फेरीमध्ये संघाना चित्र, चित्रफित आणि ध्वनीचा वापर करून त्यावर आधारित प्रश्न विचारले जातील. शेवटच्या फेरी मध्ये विद्यार्थ्यांना काही मनोरंजक परंतु, त्यांच्या वेळ आणि बुध्दीचा वापर करायला लावणारे खेळ घेऊन मगच सर्व फेरींच्या गुणांची बेरीज करून लगेचच निकाल घोषित केला जाईल असे कांबळे यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन विजय तट यांनी केले तर प्रास्ताविक करून उपस्थितांचे आभार समन्वयक राजेश कांबळे यांनी मानले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी काटकर सर, अविनाश कापसे, विकास शिंदे, पी.एम.कराड यांच्यासोबत प्रियदर्शनी क्रीडा, सांस्कृतिक व व्यायाम मंडळाचे पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

प्रश्नमंजुषा (क्विझ कॉम्पिटेशन) स्पर्धेत ३१ संघ सहभागी :

विद्यार्थ्यांना सामान्यज्ञान प्राप्त व्हावे, आधुनिक तंत्रज्ञान, माहिती व्हावे, आपला सभोताल आणि जगातील चालू घडामोडी कळाव्यात, आपल्या माहितीच्या कक्षा रूंदावल्या जाव्यात. यासाठी बालझुंबडच्या प्रश्नमंजुषा (क्विझ कॉम्पिटेशन) स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत सहभाग घेतला. या स्पर्धेतील सहभागी विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमानुसार प्रश्न विचारले होते. प्रत्येक संघाला सादरीकरणासाठी ५० मिनिटांचा अवधी दिला होता. हि स्पर्धा एकूण ५० गुणांची होती. ही स्पर्धा इयत्ता ५ वी ते इयत्ता ७ वी आणि इयत्ता ८ वी ते इयत्ता १० वी या दोन गटांसाठी घेण्यात आली. त्यात अंबाजोगाई शहर व तालुक्यातील विविध शाळांमधील इयत्ता ५ वी ते इयत्ता ७ वी गटात एकूण १५ संघ आणि इयत्ता ८ वी ते इयत्ता १० वी गटात एकूण १६ संघ असे दोन गटात मिळून ३१ संघ सहभागी झाले होते.



# बालनंदनवन इंग्लिश स्कूलमध्ये 'दर्पण दिन' उत्साहात साजरा

मानूर ।प्रतिनिधी

वृत्तपत्रसृष्टीचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त 'दर्पण दिन' बालनंदनवन इंग्लिश स्कूलमध्ये मंगळवार (ता. ६) रोजी उत्साहात साजरा करण्यात आला. मराठी पत्रकार परिषद, शिरूर कासार यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमास विविध क्षेत्रांतील मान्यवर, पत्रकार, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर समाजकल्याण आयुक्त शिवाजी शेळके, नायब तहसीलदार गणेश दहिफळे, सुरेकांत नेटके, बालनंदनवन इंग्लिश स्कूलचे संस्थापक डॉ. प्रफुल्लचंद्र बारगजे, मराठी पत्रकार परिषदेचे पदाधिकारी चंद्रकांत राजहंस, बबनराव देशमुख, विजयकुमार गाडेकर, शंकर भालेकर, जालींदर नन्नवरे, गोरख खेडकर, डिगांबर गायकवाड, ज्ञानदेव शिंगटे, प्रतीक भांडेकर, जीवन कदम आदी उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते उपस्थित पत्रकार व मान्यवरांचा बालनंदनवन इंग्लिश स्कूलच्या वतीने सन्मान करण्यात आला. मार्गदर्शन करताना वक्त्यांनी समाजातील पत्रकारितेचे स्थान, लोकशाही व्यवस्थेतील वृत्तपत्रांची भूमिका, सत्य, निडर व जबाबदार लेखनाचे महत्त्व अधोरेखित केले. बदलत्या माध्यमविश्वातही प्रामाणिक पत्रकारिता ही समाजासाठी दिशादर्शक ठरते, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना वर्तमानपत्रांचे महत्त्व, बातमी कशी वाचावी, माहिती संकलन कसे करावे, लेखनकौशल्य कसे विकसित करावे तसेच पत्रकारितेच्या मूलभूत तत्त्वांची ओळख करून देण्यात आली. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना मान्यवरांनी समर्पक उत्तरे देत पत्रकारितेतील अनुभव कथन केले.कार्यक्रमाचे नियोजन मराठी पत्रकार परिषदेचे पदाधिकारी व शाळेचे मुख्याध्यापक गणेश रोकडे यांच्या मार्गदर्शनाखाली अमोल होरणे, नीलम दळवी, संगीता खेडकर, मयुरी केदार, आकाश सानप, शुभम जायभाये, किरण सानप, अर्जुन उमाप यांनी केले. प्रस्तावना शंकर भालेकर यांनी मांडली, सूत्रसंचालन गोविंद बारगजे यांनी केले तर आभार प्रदर्शन नीलम दळवी यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिक्षक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाकडून

# ५ शिक्षीकांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ, नागपूर - पुणे यांच्या वतीने अंबाजोगाई येथील ५ शिक्षीकांना आदर्श शिक्षक पुरस्कार नुकतेच प्रदान करण्यात आले. क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या १९५ व्या जयंतीनिमित्त हा उपक्रम राबविण्यात आला.

शनिवार, दिनांक ३ जानेवारी रोजी शहरातील गटशिक्षण कार्यालयाच्या सभागृहात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १९५ व्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाकडून अंबाजोगाई येथील ५ शिक्षीकांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आले. हा उपक्रम महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाचे विभागीय अध्यक्ष बालासाहेब सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून साहित्यिक प्रा.गौतम गायकवाड, ॲड.माणिकराव आदमाने, पत्रकार डॉ.संतोष बोबडे, महासंघाचे जिल्हा सचिव राहुल पोटभरे यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालनताई जोगदंड (तालुकाध्यक्षा) या होत्या, तर यावेळी विजया मुरलीधर धिवार (गायकवाड),



आशालता नारायण धापसे, रोहिणी शेषेराव जगताप, ज्योती हनुमंतराव भोसले आणि संघमित्रा विक्रम लांडगे (वाघमारे) यांना सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आले. पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह, गौरवपत्र, शाल आणि पुष्पहार असे होते. तसेच या समारंभात बीड जिल्हा परिषदेचा आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल धनंजय वाघमारे व आंबादास काळे यांचा आणि विभागीय ऑलिम्पियाड स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या रूपेंद्र शामराव बडोले यांचाही विशेष गौरव करण्यात आला. यावेळी प्रातिनिधिक स्वरूपात सत्काराला उत्तर देताना पर्यवेक्षिका आशालता धापसे यांनी सांगितले की, माझ्या माईंच्या नांवे मला माझ्या महाराष्ट्र कास्ट्राईब कल्याण महासंघ, नागपुर-पुणे यांनी आदर्श शिक्षिका - पर्यवेक्षीका पुरस्कार देवून सन्मानित केले. खरं तर मला वाटते की, माझे कार्य एवढ्या मोठ्या महान क्रांतीज्योती सावित्रीमाईंच्या नांवे पुरस्कार घेण्याएवढे निश्चितच मोठे नसावे. पण, आपण केलेल्या कामावर आपल्यापेक्षा इतरांचे जास्त लक्ष असते आणि हेच लक्ष माझ्या महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी ठेवले असावे. माझ्या या संघटनेला मी शब्द देते की, मी यापुढेही माझ्या कार्यक्षेत्रात व कार्यक्षेत्राबाहेर ही कोणाच्या दबावाला बळी न पडता, कोणालाही न घाबरता, माझे कार्य अविरत सुरू ठेवीन व माझ्या सावित्रीमाईंच्या लेकींना जर कुठे अन्याय अत्याचार होत असेल तेथे त्यांच्या पाठीशी निश्चितच खंबीरपणे उभी राहिल अशी ग्वाही पर्यवेक्षिका धापसे यांनी दिली. यावेळी प्रास्ताविक करताना कार्यक्रमाच्या आयोजनामागील भुमिका विभागीय अध्यक्ष बालासाहेब सोनवणे यांनी विषद केली. तर साहित्यिक प्रा.गौतम गायकवाड, ॲड.माणिक आदमाने

पान १ वरून...

**जातीय द्वेषातून...**

महिन्यांनंतर सहाय्यक यंत्र अभियंता निलेश पवार यांनी जाणीवपूर्वक सदरील बस विभागीय कार्यशाळेत बोलावून खोटा पंचनामा तयार केला व खोटा अहवाल सादर करून बनसोडे यांच्यावर चौकशी लादली, आलीआहे. नुकसानभरपाई नियमानुसार भरली असतानाही केवळ आपण मागासवर्गीय असल्यामुळेच आपल्याला लक्ष्य केले जात असल्याचा तक्रार बनसोडे यांनी केला.एकीकडे सी.आर. खराब करणे, दुसरीकडे नियमबाह्य बदली आणि आता खोटी चौकशी - हा सर्व प्रकार जातीय द्वेषातून आणि सूडभावनेतून केला जात आहे, असा ठपका त्यांनी ठेवला आहे. या संपूर्ण प्रकरणाची तातडीने उच्चस्तरीय चौकशी करून आपल्याला नैसर्गिक न्याय द्यावा, तसेच जातीय भावनेतून छळ करणार्या निलेश पवार यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी ठाम मागणी वाहतूक निरीक्षक भिमकिरण विनायक बनसोडे यांनी व्यवस्थापकीय संचालक तथा उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ यांच्याकडे केली आहे.

**रोजगार हमी ....**

कार्यकारी अधिकारी यांनी दिले. द्वितीय रोजगार सेवकांचे आयडी व पासवर्ड, मस्टर हजेरीतील विसंगतीमुळे बंद असलेली कामे त्वरित सुरू करण्याचे आदेशही देण्यात आले. ग्रामपंचायत स्तरावर काम मागणी अर्ज, ऑनलाईन मस्टर, वेज लिस्ट व एफटीओ प्रक्रिया सुसूत्रपणे राबविण्याबाबत सूचना देण्यात आल्या. तसेच अनुसूचित जाती-जमाती, बचत गट व विधवा महिलांसाठी नरेगा अंतर्गत शेळीपालन शेड उभारणी व त्यासाठी बँक कर्ज सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. याशिवाय जलजीवन मिशन अंतर्गत पूर्ण व अर्धवट कामांची प्रलंबित देयके तातडीने अदा करण्याचे निर्देश देण्यात आले. सोमवारी पार पडलेल्या या मॅरेथॉन बैठकीमुळे नरेगा कामांना गती मिळून लाभार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे चित्र स्पष्ट झाले.

**एक हात मदतीचा डोंगराच्या ...**

त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेण्यात आली व आर्थिक मदत सुपूर्द करण्यात आली.यावेळी शिवसेना तालुका प्रमुख विनायक (बप्पा) मुळे, युवराज मामा शिंदे, शुभम मस्के, ह.भ.प. मुंडे महाराज, अशोक घुगे, गोरख दराडे यांच्यासह अनेक गावकरी उपस्थित होते. गणेश डोंगरे यांच्या पश्चात पत्नी व तीन लहान मुली असा परिवार आहे. कुटुंबाचा कर्ता पुरुष अचानक काळाच्या पडद्याआड गेल्याने कुटुंबावर मोठे संकट ओढावले आहे. अशा कठीण प्रसंगी शिवसेनेच्या वतीने दिलेल्या या मदतीमुळे कुटुंबाला काहीसा आधार मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

**महिला प्राध्यापिकेचा ..**

घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला आहे.

दरम्यान, ममता राठी यांनी टोकाचे पाऊल का उचलले याचे नेमके कारण अद्याप स्पष्ट होऊ

पान १ वरून...

शकले नाही. त्यांना तातडीने पुढील उपचारासाठी लातूर येथील एका खासगी रुग्णालयातील अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले असून, तिथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. पोलिसांनी रुग्णालयात जाऊन त्यांचा जबाब नोंदवून घेतला आहे. या प्रकरणाचा तपास करत असताना पोलिसांनी कौटुंबिक कलह, कामाचा मानसिक ताण किंवा अन्य काही गंभीर कारणांचा शोध सुरू केला आहे.

बर्दापूर पोलीस या प्रकरणाचा कसून तपास करत असून या घटनेशी संबंधित आणखी एक व्यक्ती सध्या फरार असल्याची माहिती समोर आली आहे. पोलीस त्या फरार व्यक्तीचा शोध घेत असून लवकरच या आत्महत्येच्या प्रयत्नामागील गूढ उकलण्याची शक्यता आहे. या घटनेमुळे अंबाजोगाई शहर आणि परिसरातून मोठी हळहळ व्यक्त होत असून सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

**शिरूर कासार ....**

हमीभावाने खरेदी करण्यासाठी शिरूर कासार येथे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने अभिनव आंदोलन करण्यात आले. यावेळी तालुकाप्रमुख सोपान काका मोरे यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी खांद्यावर 'जू' आणि डोक्यावर 'तुरीचा भारा' घेऊन सरकारचे लक्ष वेधले.

व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांची लूट: निवेदनातील प्रमुख मुद्दे

तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शिरूर कासार तालुक्यातील भुसार मालाचे व्यापारी आणि आडते शासनाने ठरवून दिलेल्या हमीभावाप्रमाणे मालाची खरेदी करत नाहीत. पिकात 'खराबी' असल्याचे कारण सांगून आणि वजन कमी दाखवून शेतकऱ्यांचा माल कवडीमोल भावाने खरेदी केला जात आहे. आर्थिक अडचणीत असलेला शेतकरी नाईलाजाने हा माल विकत असून, यात त्यांची मोठी फसवणूक होत आहे.

**चंदन तस्करांवर मोठी ...**

मिळालेल्या माहितीनुसार सोमवार दि ५ रोजी परळी तालुक्यातील धर्मापुरी-पानगाव रोड असलेली गायरान भागात चंदन विक्री करत असल्याचा खबरीवरून उपविभागीय पोलीस अधिकारी यांचा पथकाने छापा करत केलेल्या कारवाई मध्ये २ लक्ष ६० हजार रुपयांचे सुगंधित चंदन आणि चारचाकी वाहन, दुचाकी, मोबाईल असा इतर मुद्देमाल असा तब्बल ८ लक्ष रुपयांचा ऐवज जप्त करत १) पप्पु बाबुराव सुर्यवंशी, राहुल पप्पु सुर्यवंशी, तेजस कल्लप्पा कांळीवे, नितीन सटवा जाधव, अविनाश व्यंकट जाधव, व्यंकट रामचंद्र जाधव,भारत निवृत्ती गायकवाड या सात जणांना ताब्यात घेऊन परळी ग्रामीण पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

या प्रकरणी सतेश श्रीराम कागणे (उप विपोअ कार्यालय अंबाजोगाई ) यांच्या फिर्यादीवरून परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुरन १२/२०२६ कलम कलम ३०३(२),३१७(२), ३(५) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणी पुढील तपास ठाण्याचे पोउपनि निमोणे हे करत आहेत.



# बोरगाव येथे श्रीमंत यशवंतराव होळकर यांचा राज्याभिषेक सोहळा दिनानिमित्त कार्यक्रम संपन्न

केज/प्रतिनिधी

दि.६ जानेवारी रोजी केज तालुक्यातील बोरगाव बु. येथे महाराजाधिराज राज राजेश्वर श्रीमंत महाराजा यशवंतराव होळकर यांच्या राज्याभिषेक सोहळ्याचे औचित्यसाधून आरंभ फाऊंडेशन व अहिल्या प्रबोधनी मंच तर्फे यशवंतराव होळकर यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. भगवान गाते सर तसेच कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती जगन्नाथ होळकर,लक्ष्मण होळकर, पांडुरंग गाढवे,परमेश्वर खडके,मधुकर भूतकर, आश्रुबा भूतकर,विठ्ठल लोंढे,मधुकर गाते,बन्सी निंगुळे,नवनाथ गाते, बारीकराव होळकर,बन्सी होळकर,अशोक निंगुळे, दगडू निंगुळे,राजेंद्रनिंगुळे, भिवाजी होळकर,श्रीराम निंगुळे,नीलेश निंगुळे, बबन निंगुळे,विष्णू निंगुळे तसेच सकल धनगर समाज बांधव व गावातील प्रतिष्ठित नागरिकांच्या उपस्थितीमध्ये महाराजांचा राज्याभिषेक सोहळा साजरा करण्यात आला.या कार्यक्रमामध्ये महाराजांच्या पराक्रमाचा थोडक्यात इतिहास दीपक होळकर यांनी सांगितला व समाजातील विविध प्रश्नावर चर्चा करण्यात आली.

सदरीलकार्यक्रमास आयोजक म्हणून समाधान गाते,निखिल मुसळे,अँड.उत्तरेश्वर निंगुळे,गोपाळ देव निंगुळे, दीपक होळकर(अध्यक्ष अहिल्या प्रबोधिनी मंच), गणेश गुरव,हनुमंत बोराडे यांनी कार्यक्रम आयोजित करून राज्याभिषेक सोहळा अध्यक्ष यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.

# नालंदा विद्यालयामध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती बालिका दिन म्हणून संपन्न

केज/प्रतिनिधी

केज शहरातील महात्मा ज्योतिबा फुले,शिक्षण प्रसारक मंडळ केज संचलित,नालंदा विद्यालय येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले.या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री.नंदकुमार मस्के सर तर प्रमुख पाहुणे म्हणून वाघमारे सर,गरड सर हे उपस्थित होते.सर्वप्रथम राष्ट्रमाता क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.या कार्यक्रमाचे प्रस्ताविक सचिन वाघमारे सर यांनी केले.प्रास्ताविका नंतर शाळेतील विद्यार्थीनी कु. शेख जरीया,शेख झैन, आलाट विवेक,बचके आदर्श,मस्के अंकुर, शिरसाट संग्राम,शेख जियान,सय्यद नुमान, इत्यादी विद्यार्थ्यांनी माता सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाच्या प्रसंगी शाळेतील शिक्षक श्री.वाघमारे सचिन सर यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवनातील काही महत्त्वाचे प्रसंग विद्यार्थ्या समोर मांडले व शिक्षणाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

अध्यक्षीय समारोपात शाळेचे मुख्याध्यापक श्री. नंदकुमार मस्के सर यांनी क्रांतीज्योती राष्ट्रमाता सावित्रीबाई फुले यांचा जीवनपट विद्यार्थ्यासमोर मांडला.क्रांतीज्योती सावित्रीबाई यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील नायगाव येथे झाला.आईचे नाव लक्ष्मीबाई व वडिलांचेनाव खंडोजी नेवसे पाटील असे होते यांचे मुळगाव कटगुन आणि आडनाव हे गोरे होते.महात्मा फुले यांचे वय तेरा वर्ष व सावित्रीबाई फुले यांचे नऊ वर्ष अशा कमी वयामध्येच इसवी सन १८४० मध्ये या दोघांचा विवाह झाला.महिलांचे अज्ञान हे त्यांच्या अडाणी पणामध्येच आहे हे महात्मा फुलेंनी ओळखले म्हणून त्यांनी आपल्या पत्नीला घरीच वाचायला लिहायला शिकवले व आपल्याच घरापासून स्त्री शिक्षणाची सुरुवात केली. वाचायला लिहायला चांगले आल्यानंतर शाळेत जाऊन अध्ययन अध्यापन कशा प्रकारे करावे याचे सखोल प्रशिक्षण व मार्गदर्शन महात्मा फुले यांनी आपल्या पत्नी सावित्रीबाई फुले यांना केले.पेशव्यांनी पुण्या मधील फुल बागेची जमीन महात्मा फुले यांच्या वडिलांना बक्षीस म्हणून दिली होती,त्यामुळे फुले यांचे कुटुंबीय पुणे येथे येऊन राहिले व फुलांचा व्यवसाय करू लागले या व्यवसायावरून त्यांना फुले हे नाव प्राप्त झाले.महात्मा फुले यांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखून पुण्यामध्ये दि.१ जानेवारी १८४८ रोजी भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा सुरू केली. सुरुवातीला या शाळेत ६ मुली होत्या पण पुढेही संख्या १८४८ अखेरपर्यंत ४० ते ४५ पर्यंत जाऊन पोहोचली.आणि या शाळेत सावित्रीबाई फुले यांनी शिक्षिका



व मुख्याध्यापिका म्हणून अतिशय उत्कृष्टपणे कामगिरी पार पाडली.

ही शाळा सुरू केल्यानंतर काही कर्मठ सनातनी लोकांनी शाळेला कडाडून विरोध केला.धर्म बुडाला, जग बुडणार,अंगावर शेन, चिखल,व दगड फेकून विरोध केला.पण या विरोधाला न जुमानता ज्ञानदानाचे पवित्र काम त्या करत राहिल्या,प्रसंगी त्यांना घराचा ही त्याग करावा लागला.बाल हत्या प्रतिबंधक गृहाची त्यांनी स्थापनाकेली.सावित्रीबाईंनी हे बालहत्या प्रतिबंध गृह समर्थपणे चालवले. फसलेल्या महिला तरुणी व बलात्काराने पीडित होऊन गरोदर राहिलेल्या महिलांचे,विधवांचे त्या बाळंतपण करत व या बालहत्या प्रतिबंध गृह त्यांना आधार देत व सर्व बालकांना आपलीच मुले मानत.काशीबाई नावाच्या ब्राह्मण महिलेचे मूल त्यांनी दत्तक घेतले.त्या मुलाचे नाव त्यांनी यशवंत ठेवले.त्या मुलाचे अतिशय प्रेमाने पालन पोषण केले त्याचा सांभाळ केला. त्याच्यावर चांगले संस्कार केले.त्याला चांगलेशिक्षण ही दिले व शिक्षण देऊन त्याला एमबीबीएस डॉक्टर बनवले.महात्मा फुले यांनी समाजातील काही चालीरीती,रूढी, परंपरा यांना कडाडून विरोध केला.नाभिक लोकांचा संप घडवून विधवा स्त्रियांचे केशव पण बंद केले.बालविवाह विरोधी मोहीम सुरू केली विधवा पुनर्विवाहाचे समर्थन केले,सती प्रथेला कडाडून विरोध केला. कुमारी विवाहास विरोध केला.सावित्रीबाई फुले या लेखिका व कवयीत्री सुद्धाहोत्या.सावित्रीबाईंनी १८५४ ला काव्य फुले,व बावनकशी १८९२ ,सुबोध रत्नाकर यांनी प्रकाशित केले.शिक्षण मिळावा नावाची कविता लिहिली. महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना करून आंतरजातीय विवाह व विधींना प्रोत्साहन दिले . या कामी सावित्रीबाईंनी महत्त्वाचे योगदान दिले. महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी स्त्रिया आणि बहुजन समाजाला गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी शिक्षणालाच एक प्रभावी शस्त्र मानले.त्यांच्या शैक्षणिक कार्याची दखल घेऊन पुण्यामध्ये इंग्रज सरकारने मेजर कँडी यांच्या हस्ते जाहीर सत्कार केला व शाळेला सरकारी अनुदानही देऊ केले.केंद्र सरकारने १९९८ मध्ये सावित्रीबाई फुले यांच्या नावाने टपाल तिकीट सुद्धा जारी केले. त्यांच्या सामाजिक कार्याबद्दल कृतज्ञता म्हणून १९९५ पासून ३ जानेवारी हा दिवस माता सावित्रीबाईचा जन्मदिन बालिका दिन म्हणून साजरा केला जाऊ लागला.१८९७ मध्ये पुण्यामध्ये प्लेगची साथ पसरली होती व डॉक्टर यशवंत यांनी गावाच्या बाहेर माळरानावर दवाखाना सुरू करून प्लेगच्या साथीने पीडित असलेल्या रुग्णांची सेवा दवाखान्यात सुरू केली होती आणि सावित्रीबाई स्वतः पीडित असलेल्या महिला,बालकांना आपल्या पाठीवर घेऊन उपचारासाठी दवाखान्यात घेऊन जात असत अशाच एका लहान मुलाला पाठीवरून घेऊन जात असताना माता सावित्रीबाई फुले यांनाही प्लेगची लागण झाली व १० मार्च १८९७ रोजी त्या प्लेगच्या साथीमुळेच क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा मृत्यू झाला.

---

## जाहीर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार भोकरदन यांचे न्यायालयात**

**शिवराम भानुदास बोराडे**
**विरूध्द**
**ग्रामसेवक ग्रा.पं.फत्तेपुर ता.भोकरदन जि.जालना**

ज्या अर्थी अर्जदार **श्री नामे शिवराम भानुदास बोराडे रा.कुकडी ता.भोकरदन जि.जालना** येथील रहिवाशी असुन अर्जदार यांनी या कार्यालयास अर्ज **त्यांचा स्वतःचा जन्म दिनांक २२.०६.१९८९ मौजे फत्तेपुर** येथे झाला असल्याचे अर्जात नमुद केले असुन त्या अनुषंगाने त्यांनी जन्म प्रमाणपत्र आदेश मिळणेसाठी त्यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्या अर्थी, सदर जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदर जन्म नोंद बाबत कोणाचाही आक्षेप असल्यास ही जाहीर प्रगटन प्रसिध्दी झाल्यापासून १५ दिवसाच्या आत लेखी स्वरूपात आक्षेप सादर करावा जर नमुद केलेल्या कालावधीमध्ये कोणाचाही आक्षेप या कार्यालयास प्राप्त झाला नाही. तर संबंधीत प्रकरणात कायद्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी. आज दि.१९.१२.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले जाते.

**स्वाक्षरित/-**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**भोकरदन**

---

## जाहीर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार भोकरदन यांचे न्यायालयात**

**भानुदास गंगाराम बोराडे**
**विरूध्द**
**ग्रामसेवक ग्रा.पं.वाकडी/कुकडी ता.भोकरदन जि.जालना**

ज्या अर्थी अर्जदार **श्री नामे भानुदास गंगाराम बोराडे रा.कुकडी ता.भोकरदन जि.जालना** येथील रहिवाशी असुन अर्जदार यांनी या कार्यालयास अर्ज **देवून त्यांचा स्वतःचा जन्म दिनांक २०.०४.१९७० मौजे कुकडी** येथे झाला असल्याचे अर्जात नमुद केले असुन त्या अनुषंगाने त्यांनी जन्म प्रमाणपत्र आदेश मिळणेसाठी त्यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्या अर्थी, सदर जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदर जन्म नोंद बाबत कोणाचाही आक्षेप असल्यास ही जाहीर प्रगटन प्रसिध्दी झाल्यापासून १५ दिवसाच्या आत लेखी स्वरूपात आक्षेप सादर करावा जर नमुद केलेल्या कालावधीमध्ये कोणाचाही आक्षेप या कार्यालयास प्राप्त झाला नाही. तर संबंधीत प्रकरणात कायद्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी. आज दि.१६.१२.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले जाते.

**स्वाक्षरित/-**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**भोकरदन**

---

**तहसीलदार, मामलेदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१०६३ दि.३०.१२.२०२५**

## जाहिर प्रगटन

अर्जदार **बालु लक्ष्मण ठाकरे, रा.गोंदी ता.अंबड** यांनी यांच्या **मुलगा नामे सागर बालु ठाकरे यांच्या** जन्म नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सागर बालु ठाकरे | मुलगा | ०३.०१.२०२३ |


निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ३०/१२/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---



# मच्छिंद्रगडावर प्राचार्य. घरगीने सर यांचा सेवानिवृत्ती निमित्त भव्य गौरव सोहळा संपन्न

मानूर ।प्रतिनिधी

प्राचार्य ए. एम. घरगीने सर यांच्या वयानुसार सेवानिवृत्ती निमित्त मच्छिंद्रगड येथील श्री निगमानंद माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, निमगाव (मायंबा) येथे संस्थेच्या वतीने गुरुवारी भव्य व भावपूर्ण गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास मठाधिपती महंत जनार्दन महाराज, महंत रामेश्वर महाराज, तहसीलदार सुरेश घोळवे,शांतीवन चे दीपक काका नागरगोजे, माजी शिक्षणाधिकारी सोनवणे,माजी जिल्ह परिषद सदस्य आश्रुबा खरमाटे, दैनिक सकाळचे पत्रकार चंद्रकांत राजहंस, जालिंदर नन्नवरे, गोरख खेडकर, डिगांबर गायकवाड, प्राचार्य जायभाय, पांडुरंग थोरात यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ए. जी. थिटे यांनी केले. यावेळी संस्थेच्या व विद्यालयाच्या वतीने सेवानिवृत्त प्राचार्य ए. एम. घरगीने सर यांचा शाल, श्रीफळ देऊन सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. मान्यवरांनी आपल्या मनोगतातून घरगीने सर यांच्या दीर्घ सेवाकाळातील शैक्षणिक कार्य, शिस्तप्रियता, विद्यार्थ्यांप्रती असलेली आपुलकी व विद्यालयाच्या प्रगतीसाठी केलेले योगदान यांचा गौरव केला. अनेकांनी त्यांच्या कार्यकाळातील आठवणींना उजाळा देत त्यांच्या कार्याचा आदर्श पुढील पिढीने घ्यावा, असे मत व्यक्त केले.

यावेळी विद्यार्थ्यांनी तसेच आजी-माजी विद्यार्थ्यांनी आपल्या भावना व्यक्त करत घरगीने सर यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. आजी-माजी विद्यार्थ्यांच्या व मान्यवरांच्या वतीने त्यांना भेटवस्तू, कपडे, हार व शाल देऊन सत्कार करण्यात आला. संपूर्ण कार्यक्रमात भावनिक वातावरण अनुभवायला मिळाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यालयाचे शिक्षक नरेश घुंगरड यांनी केले. या सोहळ्यास पालक, ग्रामस्थ, विद्यार्थी, महिला मंडळाच्या सदस्य, संस्थेचे संचालक व सभासद, संत-महंत, शिक्षक, प्राध्यापक तसेच कर्मचारीवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. सेवानिवृत्तीनंतरही घरगीने सर यांचे मार्गदर्शन व योगदान शैक्षणिक क्षेत्राला लाभावे, अशा सदिच्छा उपस्थितांनी व्यक्त केल्या.

---

## जाहीर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार भोकरदन यांचे न्यायालयात**

**गणेश भानुदास बोराडे**
**विरूध्द**
**ग्रामसेवक ग्रा.पं.वाकडी/कुकडी ता.भोकरदन जि.जालना**

ज्या अर्थी अर्जदार **श्री नामे गणेश भानुदास बोराडे रा.कुकडी ता.भोकरदन जि.जालना** येथील रहिवाशी असुन अर्जदार यांनी या कार्यालयास अर्ज **देवून त्यांचा स्वतःचा जन्म दिनांक ०५.११.१९९१ मौजे कुकडी** येथे झाला असल्याचे अर्जात नमुद केले असुन त्या अनुषंगाने त्यांनी जन्म प्रमाणपत्र आदेश मिळणेसाठी त्यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्या अर्थी, सदर जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदर जन्म नोंद बाबत कोणाचाही आक्षेप असल्यास ही जाहीर प्रगटन प्रसिध्दी झाल्यापासून १५ दिवसाच्या आत लेखी स्वरूपात आक्षेप सादर करावा जर नमुद केलेल्या कालावधीमध्ये कोणाचाही आक्षेप या कार्यालयास प्राप्त झाला नाही. तर संबंधीत प्रकरणात कायद्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी. आज दि.१६.१२.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले जाते.

**स्वाक्षरित/-**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**भोकरदन**

---

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्रीमती एस.एच.पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.०१/२०२६**
आशा विरुध्द निरंक
**(मार्फत-अॅड.पाटील वाय.एच.)**

ज्याअर्थी मयत नामे **शरद पि.किसनराव पवार हे दि.२२.०५.२०२५ रोजी मौजे बोरी पिंपळगांव ता.गेवराई जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१. आशा भ्र.शरद पवार, वय-५३ वर्षे, धंदा-घरकाम, रा.बोरी पिंपळगांव ता.गेवराई जि.बीड, २. करण पि.शरद पवार, वय-३० वर्षे, धंदा-शेती, रा.सदर, ३. किशोर शरद पवार, वय-२८ वर्षे, धंदा-शेती, रा.सदर** यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन अॅक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **शरद पि.किसनराव पवार** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.-/-/-** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख -२१/०२/२०२६**

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**श्री रविंद्र अ.मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई जि.बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.०९/२०२६**
रामप्रसाद पि.रामा उर्फ रामु जाधव विरुध्द निरंक
**(मार्फत-अॅड.एस.डी.कुलकर्णी, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे **रामा लिंबाजी जाधव हे दि.१७.१०.२०२२ रोजी मौजे रूई ता.गेवराई जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१.रामप्रसाद पि.रामा उर्फ रामु जाधव वय-४४ वर्षे, धंदा-शेती, रा.रूई ता.गेवराई जि.बीड** यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन अॅक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **रामा लिंबाजी जाधव** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.०५/०१/२०२६** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख -०९/०२/२०२६**

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्रीमती एस.एच.पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१०३७/२०२५**
शांताबाई विरुध्द निरंक
**(मार्फत-अॅड.आंबट आर.आर.)**

ज्याअर्थी मयत नामे **लक्ष्मीबाई भ्र.गंगाधर मोटे हे दि.१३.०८.२०२५ रोजी मौजे निकम गल्ली गेवराई ता.गेवराई जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१. शांताबाई भ्र.गंगाधर मोटे, वय-७० वर्षे, धंदा-घरकाम, रा.निकम गल्ली, गेवराई ता.गेवराई जि.बीड** यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन अॅक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **लक्ष्मीबाई भ्र.गंगाधर मोटे** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.-/-/-** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख -०४/०२/२०२६**

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्रीमती एस.एच.पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१०५८/२०२५**
रेखाबाई विरुध्द निरंक
**(मार्फत-अॅड.बांगर ए.बी.)**

ज्याअर्थी मयत नामे **शशिकलाबाई भ्र.भगवंतराव वाघ हे दि.२७.०९.२००७ रोजी मौजे तळणी ता.सिल्लोड जि.छत्रपती संभाजीनगर** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१. रेखाबाई भ्र.रमेश देशमुख, वय-६० वर्षे, धंदा-घरकाम, रा.दैठण ता.गेवराई जि.बीड** यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन अॅक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **शशिकलाबाई भ्र.भगवंतराव वाघ** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.-/-/-** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख -०६/०२/२०२६**

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्री रविंद्र अ.मिसाळ यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१०५४/२०२५**
छगाबाई श्रीमंत आलगुडे विरुध्द निरंक
**(मार्फत-अॅड.आर.आर.रूचके, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे **कृष्णा पि.श्रीमंत आलगुडे हे दि.२६.०६.२०२४ रोजी दिमाखवाडी ता.गेवराई जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१. छगाबाई भ्र.श्रीमंत आलगुडे वय-४८ वर्षे, धंदा-शेती, रा.दिमाखवाडी ता.गेवराई जि.बीड, २. श्रीमंत पि.कुंडलिक आलगुडे वय-५१ वर्षे, धंदा-शेती, रा.दिमाखवाडी ता.गेवराई जि.बीड** यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन अॅक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **कृष्णा पि.श्रीमंत आलगुडे** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.२४/१२/२०२५** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख -०२/०२/२०२६**

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्रीमती एस.एच.पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१०५५/२०२५**
सुभाष विरुध्द निरंक
**(मार्फत-अॅड.ठोसर डी.के.)**

ज्याअर्थी मयत नामे **कचरू बाबु तेरे हे दि.१४.०१.२०१७ रोजी मौजे दैठण ता.गेवराई जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१.सुभाष पि.कचरू तेरे वय-४८ वर्षे, धंदा-शेती, रा.दैठण ता.गेवराई जि.बीड, २. दिलीप पि.कचरू तेरे, वय-५९ वर्षे, धंदा-शेती, रा.दैठण ता.गेवराई जि.बीड, ३. विठ्ठल पि.कचरू तेरे, वय-५० वर्षे, धंदा-शेती, रा.दैठण ता.गेवराई जि.बीड, ४. कांताबाई भ्र.अंकुश बाबर, वय-४९ वर्षे, धंदा-शेती, रा.दैठण ता.गेवराई जि.बीड** यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन अॅक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **कचरू बाबु तेरे** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.-/-/-** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख -०६/०२/२०२६**

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

## तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात साने गुरुजी निवासी विद्यालयाने पटकावले एकूण चार पारितोषिके



केज/प्रतिनिधी

५३ वे केज तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन गटशिक्षणाधिकारी कार्यालय केज व साने गुरुजी निवासी विद्यालय केज यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच साने गुरुजी निवासी विद्यालय केज या ठिकाणी संपन्न झाले.यात माध्यमिक गटातून पवार अजित बाळासाहेब यांच्या बहुउपयोगी सोलर प्लेट या प्रयोगास तृतीय क्रमांक तसेच उच्च प्राथमिक दिव्यांग गटातून कु.पूजा ठोंबरे हीच्या जल शुद्धीकरण या प्रयोगास प्रथम क्रमांक,माध्यमिक शिक्षक गटातून श्रीमती नागरगोजे मनिषा यांच्या डिजिटल युगात ए आय च्या मदतीने विद्यार्थ्यांना कृतीयुक्त शिक्षणासाठी साहित्य निर्मिती यास प्रथम क्रमांक तर प्रयोगशाळा सहाय्यक गटातून आकाश केदार यांच्या बहू उपयोगी पिठाची चाळणी या प्रयोगास प्रथम क्रमांक मिळालेला आहे.अशा एकूण चार पारितोषिक सह साने गुरुजी निवासी विद्यालय तालुक्यात अव्वल ठरले आहे.या सर्वांना विज्ञान शिक्षिका नागरगोजे मॅडम,श्रुती लहाने मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले होते.या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष ड.उद्धवराव कराड सर, राजेश कापसे,प्रा.डॉ. कविता गित्ते कराड मडम यांनी या सर्वांचे अभिनंदन करून जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# अंबाजोगाई नगरपरिषद लोकविकास महाआघाडीच्या गटनेतेपदी सय्यद ताहेरभाई यांची निवड

### अंबाजोगाईच्या विकासासाठी एकत्रितपणे काम करण्याचा संकल्प

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

अंबाजोगाई नगरपरिषदेमध्ये लोकविकास महाआघाडीच्या तिकिटावर व राजकिशोर मोदी यांच्या नेतृत्वाखाली सर्वाधिक २० नगरसेवक निवडून आले. निवडून आलेल्या नगरसेवकांमधून सय्यद ताहेरभाई यांची अंबाजोगाई नगरपरिषद लोकविकास महाआघाडीच्या गटनेतेपदी सर्वांनूमते निवड करण्यात आली.

मंगळवार, दिनांक ०६ जानेवारी २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या उपस्थितीत सय्यद ताहेरभाई यांच्या गटनेतेपद निवडीचे पत्र लोकविकास महाआघाडीच्या वतीने त्यांना सादर करण्यात आले. यावेळी लोकविकास महाआघाडीचे प्रमुख राजकिशोर मोदी, माजी आमदार पृथ्वीराज साठे, ज्येष्ठ विधीज्ञ ॲड.विष्णुपंत सोळंके, बबनराव लोमटे यांच्यासह ज्येष्ठ नगरसेवक हाजी इस्माईल हिरू गवळी, दिनेश मोतीलाल



भराडिया, महेश बाळासाहेब कदम, महेश बालासाहेब लोमटे, ॲड.विकास रामकृष्ण काकडे, मालू भगवान जोगदंड, आकाश जिवनराव कराड, राजपाल संभाजी जावळे, नजीर उमरदराजखान पठाण, सौ.जयश्रीताई पृथ्वीराज साठे, सौ.दिपाताई बबन ऊर्फ दाजीसाहेब लोमटे, शेख शमीम शेख रहीम, बशीरा शफीक सय्यद, नाजनीन बेगम अकबरखाँ पठाण, शेख शिरीन अशफाक, सौ.श्रुतीताई अमोलराव लोमटे, सौ.संगिताताई दाजीसाहेब लोमटे, सौ.रेखाताई विलास जाधव, सौ.सोनीताई दत्तात्रय सरवदे हे लोकविकास महाआघाडीचे सर्व २० नगरसेवक आणि दाजीसाहेब लोमटे, अमोल लोमटे, अकबरभाई पठाण, सचिन जाधव, ॲड.अनिल लोमटे, जफरभाई शेख, रौफभाई बिल्डर हे उपस्थित होते. यावेळी राजकिशोर मोदी, माजी आमदार पृथ्वीराज साठे, बबनराव लोमटे व सर्व नगरसेवकांनी सय्यद ताहेरभाई यांचे अभिनंदन करून आगामी काळात अंबाजोगाई शहराच्या विकासासाठी एकत्रितपणे काम करण्याचा संकल्प व्यक्त केला.

महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम व संबंधित नियमानुसार गटनेतेपदाची निवड :

लोक विकास महाआघाडीच्या नवनिर्वाचित सर्व २० नगरसेवकांनी एकत्रित येत सर्वानुमते नगरपरिषदेत महाआघाडीचा अधिकृत गट स्थापन केला आहे. या संदर्भात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना लेखी पत्र देण्यात आले असून गट स्थापन करण्याबाबत व गटनेता निवडीचा ठराव व त्याबद्दलचे इतिवृत्त सादर करण्यात आले आहे. लोक विकास महाआघाडीच्या गटनेतेपदी सय्यद ताहेरभाई यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडपत्राच्या अनुषंगाने गट स्थापन करून गटनेता निवड केल्याचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना आज रोजी देण्यात आले आहे. महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम व संबंधित नियमानुसार या गटाची अधिकृत नोंद घेण्यात यावी, अशी विनंती पत्राद्वारे करण्यात आली आहे. अंबाजोगाई शहरातील नागरिकांच्या सेवेसाठी आम्ही कटिबद्ध आहोत. सर्वांना सोबत घेऊन सर्वांचा विकास हा आपला नेहमीचा मानक असून यासाठी जबाबदारी देताना सामाजिक अभिसरण व ज्येष्ठ व नव्या प्रतिनिधीची सांगड घालण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे. याच अभिसरण व समीकरणात माझे सहकारी सय्यद ताहेरभाई यांची नगरपरिषद गटनेता म्हणून निवड करण्यात आली.

-राजकिशोर मोदी
(प्रमुख, लोकविकास महाआघाडी, अंबाजोगाई.)

## बीड जिल्हा काँग्रेस कमिटीची बीड येथे ८ जानेवारी रोजी बैठक

केज/प्रतिनिधी

बीड जिल्हा काँग्रेस कमिटीची बैठक दि. ८ जानेवारी गुरुवार रोजी सकाळी ११ वाजता बीड येथे होणार आहे.अखिल भारतीय काँग्रेस कमिटी सचिव तथा मराठवाडा सहप्रभारी श्रीमती रेहाना चिस्ती यांच्या मार्गदर्शना खाली ही बैठक महिला महाविद्यालयात संपन्न होत असून या बैठकीस महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस तथा पिंपरी चिंचवड निवडणुकीचे प्रभारी श्री. आदित्य दादा पाटील व बीड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री. राहुल भैया सोनवणे हे उपस्थित राहणार आहेत. या बैठकीनंतर जिल्हाधिकारी कार्यालया समोर मनरेगा बाबत केंद्र सरकारने पारित केलेल्या चुकीच्या कायद्याच्या विरोधात आंदोलन करण्यात येणार आहे या बैठकीस सर्व आजी माजी,पदाधिकारी, लोकप्रतिनिधिंनी उपस्थित राहण्याचे आवाहन बीड जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष प्रवीणकुमार शेप यांनी केले आहे.

# केकतसारणी येथे कापूस प्रक्षेत्र दिन व सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी



केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील केकतसारणी येथे शनिवार दि.०३ जानेवारी २०२६ रोजी कृषि विज्ञान केंद्र,डिघोळअंबा (अंबाजोगाई) यांच्या वतीने कापूस शेती दिन तसेच क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.भारतीय कृषी अनुसंधान परिषद अंतर्गत केंद्रीय कापूस संशोधन संस्था,नागपूर यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्ह्यात राबविण्यात येतअसलेल्या विशेष कापूस प्रकल्पा अंतर्गत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केकतसारणी गावच्या सरपंच अनिता पंडितराव सावंत या होत्या.यावेळी कृषि विज्ञान केंद्र, अंबाजोगाई येथील कृषी शास्त्रज्ञ नरेंद्र जोशी (उद्यानविद्या),कृष्णा कर्डीले (कृषिविद्या), सुहास पंके (कृषिविस्तार) यांच्यासह बळीराम वीर (राशी सिड्स),प्रगतशील शेतकरी,महिला शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमात सघन लागवड पद्धतीने (एचडीपीएस) कापूस लागवडीबाबत माहिती देण्यात आली. मार्गदर्शन करताना शास्त्रज्ञ कृष्णा कर्डीले यांनी कापूस पिकातील गळ फांदी छाटणीचे महत्व,सघन लागवड पद्धतीचे फायदे,योग्य मशागत,सुधारित तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यास उत्पादनात होणारी वाढ याविषयी सविस्तर माहिती दिली. शेतीकडे व्यवसाय म्हणून पाहण्याची गरज असून धाग्याच्या गुणवत्तेनुसार कापसाला योग्य दर मिळण्यासाठीशेतकऱ्यांनी सुधारित तंत्रज्ञान अवलंबवावे.तसेच 'एक गाव -एक वाण - एक तंत्रज्ञान' ही संकल्पना स्वीकारल्यास शेतकऱ्यांचा आर्थिक लाभ होईल,असे त्यांनी सांगितले.

सुहास पंके यांनी केंद्र सरकारच्या जी राम जी योजनेसह विविध शासकीय योजनांची माहिती दिली.याचबरोबर सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणासाठी केलेले कार्य अधोरेखित करत, महिलांनी शिक्षण,शेती व उद्योजकतेत पुढे येण्याचे आवाहन केले. सावित्रीबाई फुले यांनी महिलांना आत्मनिर्भर बनवण्याचा जो विचार मांडला,तो आजच्या आधुनिक शेतीसाठी अत्यंत महत्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले.महिलांचा शेती तील सहभाग वाढल्यास कुटुंबाची व गावाची आर्थिक प्रगती वेगाने साध्य होऊ शकते,असे त्यांनी स्पष्ट केले.

नरेंद्र जोशी यांनी फळबाग व्यवस्थापन,आद्रक पिकातील मर रोग व त्यावरील उपाययोजना, अन्नद्रव्य व खत व्यवस्थापन यावर मार्गदर्शन केले.बळीराम वीर यांनी कापूस पिका साठी प्लांटरद्वारे पेरणी, यंत्राद्वारे वेचणी,योग्य वाणांची निवड तसेच कोरडवाहू भागात प्लांटरद्वारे लागवडीचे महत्त्व विषद केले.

कार्यक्रमात शेतकरी व महिला शेतकऱ्यांनी सघन लागवड पद्धतीने मिळालेल्या उत्पादन वाढीचे अनुभव सांगितले. सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त महिलांनी शिक्षण,शेती व समाज परिवर्तनात सक्रिय भूमिका घ्यावी,असा संदेश देण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुहास पंके यांनी केले, तर अध्यक्षीय समारोप अनिता सावंत यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी रविंद्र अंबाड, ऋषिकेश काळे,सागर काळे तसेच ग्रामस्थांचे मोलाचे सहकार्य लाभले. प्रत्यक्ष उपयोगी व मार्गदर्शक माहिती मिळाल्याने उपस्थित शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

### सिंदफणा अर्बनच्या दिनदर्शिकेचे सामाजिक कार्यकर्ते

## दिपक काका नागरगोजे हस्ते प्रकाशन संपन्न



मानूर ।प्रतिनिधी

शिरुर कासार शहरातील अग्रगण्य असलेल्या सिंदफणा अर्बन बँकेची २०२६ ची दिनदर्शिका प्रकाशित झाली असून या दिनदर्शिकेचे प्रकाशन जेष्ट सामाजिक कार्यकर्ते दिपक काका नागरगोजे यांच्या शुभहस्ते व संस्थापक अध्यक्ष आजीनाथ गवळी यांचेसह मान्यवर यांच्या उपस्थितीमधे मोठया उत्साहात संपन्न झाले.शिरूर तालुक्यातील व शहरातील ग्राहकांचे हित जोपासत विश्वास संपादन केलेल्या सिंदफणा अर्बनच्या २०२६ ची दिनदर्शिका प्रकाशित झाली असून या दिनदर्शिकेचे प्रकाशन जेष्ट सामाजिक कार्यकर्ते दिपक नागरगोजे यांच्या शुभहस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीमधे मोठया उत्साहात संपन्न झाले. यावेळी दिपक नागरगोजे यांनी बँकेच्या कामकाजाबद्दल समाधान व्यक्त करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.या प्रसंगी पंचायत समितीचे विस्तार अधिकारी नितीन तिजोरे,चेअरमन भगवानराव पाखरे,पाडळीचे माजी सरपंच दत्ता इंगळे,युवानेते विनोद काकडे,पत्रकार गोकुळ पवार,पत्रकार सतिष मुरकुटे,संपादक प्रकाश साळवे,पत्रकार गौतम औसरमल, पत्रकार मनोज परदेशी,अंगद येवले,गणेश पवार,भागवत गर्जे,सुदाम पवार यांचेसह बँकेचे व्यवस्थापक राम सुरे,,कु. योगीता गवळी आदींची उपस्थिती होती.या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन करून आभार संस्थापक आजीनाथ गवळी यांनी मानले.




## वडवणीत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने दर्पण दिन विविध उपक्रमाने साजरा

वडवणी ।प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई संस्थापक अध्यक्ष संजय जी भोकरे साहेब, प्रदेशाध्यक्ष गोविंदजी वाकडे सर, सरचिटणीस डॉक्टर विश्वासराव आरोटे, प्रदेश संपर्कप्रमुख वैभवजी स्वामी सर, मराठवाडा अध्यक्ष अनिल राव सावंत साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली शाखा बीड जिल्हा,वडवणी तालुका, डिजिटल मीडिया,पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती यांच्यावतीने वडवणी येथील ज्ञानगंगा व शिवालय गुरुकुल येथे आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांनी सुरू केलेल्या दर्पण वर्तमानपत्र दिनानिमित्त दर्पण दिन विविध उपक्रमाने साजरा करण्यात आला.

वडवणी येथे ज्ञानगंगा व शिवालय गुरुकुल येथे दर्पण दिनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रथम बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच यावेळी जेष्ठ पत्रकार बुवासाहेब शिंदे पाटील,शासकीय बीड जिल्हा परिषदेच्या वतीने दरवर्षी दिला जाणारा आदर्श शिक्षक पुरस्कार वडवणी तालुक्यातील प्राप्त आदर्श शिक्षक पुरस्कार गोरक्षनाथ मुंडे सर , रमेश धायतिडक सर, तुकाराम राठोड सर यांचा शाल पुष्पगुच्छ देऊन सत्कार करून सन्मान करण्यात आला .तसेच यावेळी विद्यार्थ्यांना खाऊचे व शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले तसेच यावेळी भाजपचे माजी तालुका अध्यक्ष राम पाटील सावंत यांना वाढदिवसानिमित्त सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या .तसेच यावेळी अनेक मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले .यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख विनायक बप्पा मुळे, सुग्रीव मुंडे,युवराज मामा शिंदे यासह या कार्यक्रमाचे आयोजक पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष अँड. विनायक जाधव ,तालुका अध्यक्ष अशोक निपटे, डिजिटल मीडिया तालुका अध्यक्ष सतीशराव मुजमुले, पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे तालुका अध्यक्ष प्रा. श्रीनिवास काकडे,सचिव अर्जुनराव मुंडे,पत्रकार गंगाभिष्म अडिल, पत्रकार शंकरराव झाडे,पत्रकार अशोकराव फपाळ, पत्रकार शातीनाथ जैन,पत्रकार विष्णू डोईफोडे सर, पत्रकार नारायणराव जाधव, पत्रकार शेख एजाज, पत्रकार अंकुश पवार, पत्रकार शंकरराव जाधव इत्यादीनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विष्णू डोईफोडे सर यांनी तर आभार प्रदर्शन सतीश राव मुजमुले यांनी केले यावेळी विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खोटी व बनावट नावे लावून मतदार करणाऱ्या व त्यांना प्रोत्साहन देणाऱ्यांची सखोल चौकशी करा

### सामाजिक कार्यकर्ते सलीम बापू यांचे उपविभागीय कार्यालया समोर उपोषण सुरू

माजलगाव ।प्रतिनिधी

जुना प्रभाग क्र.१२ (नवीन प्रभाग क्र.१३) आझाद नगर, माजलगाव सन २०१६-२०१७ साली जे नगर परिषद माजलगाव यांचे मतदान झाले त्यावेळी बी.एल.ओ (शिक्षक) यांनी जे नवीन मतदार लोकांची नावे लावण्याबाबतचे अर्ज तहसिलदार साहेब माजलगाव यांच्याकडे सादर केले त्या अर्जाच्या मुळ संचिका संहितची यादी देन्यात यावी व खोटी व बनावट आधार कार्ड तयार करून बाहेरील गावाच्या लोकांनी बोगस मतदार केले याची व त्यांना प्रोत्साहन देणाऱ्या अधिकारी व नेत्यांची सखोल चौकशी करा या मागणी साठी येथील सामाजिक कार्यकर्ते तथा आंबेडकरी विचार मोर्चा व आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाचे मराठवाडा अध्यक्ष सय्यद सलीम बापू यांनी काल दि ३० डिसेंबर पासून येथील उपविभागीय कार्यालयात समोर आमरण उपोषण सुरू केले आहे



उपरोक्त विषय असा आहे की जुना प्रभाग क्र.१२ (नवीन प्रभाग क्र.१३) आझाद नगर, माजलगाव येथे तत्कालीन सन २०१६-२०१७ या वर्षी जी नगर परिषद माजलगाव यांची निवडणुक घेण्यात आली. त्यावेळी बी.एल.ओ (शिक्षक) यांनी नवीन नावाची नोंद घेवुन त्याची यादी तहसिलदार साहेब, माजलगाव यांच्याकडे देण्यात आली. त्यांनी लोकांची नावे नवीन समाविष्ट केली त्या लोकांच्या नावाची संचिका निवेदकास न्यायालयीन कामासाठी हवी आहे ती देण्यात यावी. कारण त्या यादीमध्ये खोटे बनावटी लोकांची नावे समाविष्ट करण्यात आलेली आहे.

तसेच नाशिक, पाथरी, पात्रुड, माजलगाव, परभणी आदी सह ग्रामीण भागातील बेकायदेशीर लोकांची नावे व जे लोक सदरील प्रभागामाध्ये राहत नाहीत व त्यांचा या भागाशी कुठल्याही प्रकारे समंध नाही त्यांच्या देखील नावाचा उल्लेख करुन बोगस नावे लावली. तसेच एकाच माणसाने अनेक लोकांची नावे लावली त्यांच्याकडे आधारकार्ड देखील उपलब्ध नाही केवळ खोटे व बोगस नावाची नोंद यादीमध्ये घेण्यात आले. त्यांचा मोठा परिणाम नुकत्याच सन २०२५ निवडणुकीमध्ये झालेला आहे. बोगस मतदान कार्ड दलालाच्या हातात देवुन दलालाच्या सहाय्याने तहसिल मध्ये देवुन खोटी नावे लावली. तसेच वरील नावाबाबतचा आक्षेप आताच्या सन २०२५ च्या निवडणुकीच्यावेळी सुशांत पौळ यांनी घेतला होता. परंतु त्यांचा आक्षेप देखील दाबुन टाकण्यात आला. तसेच निवेदकाने देखील तोंडी आक्षेप घेतला होता. परंतु यांचा देखील कोणताही आक्षेप व बाजु ऐकुन न घेता त्यावेळी तेथे निवडणुक अधिकारी व मुख्याधिकारी साहेब स्वतःआले होते व चर्चा देखील झाली. वरील बेकायदेशीर नावामुळे सन २०२५ च्या नगर परिषदच्या निवडणुकीवर परिणाम झाला. सदर परिणाम हा नगरअध्यक्ष व दोन नगरसेवक यांच्यावर झाला. निवडणुक अधिकारी यांच्या नियमानुसार तात्काळ कार्यवाही करून त्यांना कडक शासन झाले पाहिजे या साठी जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते व आंबेडकरी विचार मोर्चा ,आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चा चे मराठवाडा अध्यक्ष सय्यद सलीम बापू यांनीऑड सय्यद अल्ताफ ,शेख इमू,सय्यद बाबू,मिरझा माहेमुद बेग,शेख माहेमुद , यांच्या सह आपल्या असंख्य कार्यकर्ते समवेत आमरण उपोषण सुरू केले आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अॅण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# काँग्रेस संपणारी संघटना नाही तर फिनिक्सप्रमाणे पुन्हा झेप घेणारा विचार- मुजाहेद अली खान

काँग्रेस संपली अशा वल्गना करणाऱ्यांनी एकदा इतिहासाची पाने चाळून पाहावीत.काँग्रेस हा केवळ सात दशकांचा इतिहास नाही तर या देशाच्या मातीतील संघर्षाचा हुंकार आहे.आज जे सत्तेच्या मस्तीत पक्ष फोडण्याचे आणि नेत्यांच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार करत आहेत त्यांनी हे लक्षात ठेवावे की सत्ता येते आणि जाते पण जनमानसातील विश्वास विकत घेता येत नाही.

जेव्हा नावावर मतं पडायची

एक काळ असा होता की काँग्रेसचा हात म्हणजे विकासाची हमी होती.उमेदवार कोण कुठला हे गौण असायचे जनतेचा विश्वास फक्त तिरंग्यातील त्या चिन्हावर आणि काँग्रेसच्या नीतिमत्तेवर होता. रस्ते,धरणे,शाळा आणि स्वावलंबी भारत ही काँग्रेसने दिलेली देणगी आहे.तेव्हा विरोधकांचे डिपॉझिट जप्त होणे ही बातमी नसायची तर तो काँग्रेसच्या कामावर जनतेने मारलेला शिक्का असायचा.

स्वार्थासाठी पक्षांतर आणि सत्तेचा खेळ काँग्रेसने ज्यांना शून्यातून विश्व निर्माण करून दिले ज्यांना सत्तेच्या शिखरावर बसवले त्यांनीच कठीण काळात पक्षाची साथ सोडली.हा कोणताही वैचारिक बदल नव्हता तर तो केवळ सत्ता पैसा आणि ईडी-सीबीआय च्या दहशतीचा सौदा होता.ज्यांनी काँग्रेसच्या अन्नावर स्वतःची घरे भरली तेच आज सत्तेच्या मोहापायी भाजपच्या पालख्या वाहत आहेत.पण लक्षात ठेवा गद्दारांनी पक्ष सोडला तरी जनता आजही तिथेच आहे भाजपचा नंबर वन' चा देखावा आणि वास्तव

आज भाजप स्वतःला देशातील सर्वात मोठा पक्ष म्हणवून घेतो. पण हा मोठेपणा कशाच्या जोरावर ? सरकारी यंत्रणांचा नंगानाच ? पैशाचा अमाप वापर ? की फोडाफोडीचे गलिच्छ राजकारण आजचे राजकारण विकासाभोवती नाही तर ब्लॅकमेलिंग आणि भीती यावर आधारलेले आहे.धर्म-जातीच्या नावाने सामान्य माणसाला भुलवून मूलभूत प्रश्नांपासून दूर नेण्याचे काम सुरू आहे.रस्ते, आरोग्य,महागाई आणि बेरोजगारीवर बोलण्याऐवजी केवळ भावनिक राजकारण करून सत्ता टिकवली जात आहे.

काँग्रेस: संविधानाची ढाल

काँग्रेस ही केवळ निवडणूक लढवणारी यंत्रणा नाही.ती स्वातंत्र्यलढ्याची वारसदार आहे आणि संविधानाची खरी रक्षक आहे.अनेकदा वावटळी आल्या अनेकदा वाघाला घेरण्याचे प्रयत्न झाले पण काँग्रेस प्रत्येक वेळी अधिक जोमाने उभी राहिली.कारण काँग्रेसचा पाया दिल्लीच्या तख्तावर नाही तर सामान्य माणसाच्या मनात आहे.

संघर्षातून नवे पर्व सुरू होईल

होय आज आव्हाने मोठी आहेत. संघटनात्मक बांधणीत काही उणिवा असतील पण ही वादळापूर्वीची शांतता आहे. जेव्हा जेव्हा सत्तेचा माज वाढतो आणि लोकशाही धोक्यात येते, तेव्हा देश पुन्हा एकदा काँग्रेसकडेच आशेने पाहतो. सत्तापिपासू लोक इतिहास बदलू शकत नाहीत इतिहास तेच घडवतात जे तत्त्वांसाठी लढतात.

शेवटचा शब्द

काँग्रेस संपवण्याचे स्वप्न पाहणाऱ्यांनी हे विसरू नये की काँग्रेस हा एक विचार आहे. लोक नेते बदलतील पण विचार कधीच मरत नाही.नव्या ऊर्जेसह आणि जुन्याच मूल्यांसह काँग्रेस पुन्हा एकदा या देशाच्या कणाकणात घुमेल.

कारण काँग्रेस झुकणार नाही काँग्रेस थांबणार नाही.

मुजाहेद अली खान



## गंगाई-बाबाजी राज्यस्तरीय कला रौप्य महोत्सवात गंगुबाई धोंडे प्राथमिक शाळेचा प्रथम क्रमांक

आष्टी (प्रतिनिधी)

भगवान महाविद्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेला राज्यस्तरीय गंगाई - बाबाजी रौप्य कला महोत्सव उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या पार पडला. या महोत्सवात राज्यभरातील एकूण ५४ शाळांनी सहभाग नोंदवला होता. या स्पर्धेत गंगुबाई आनंदराव धोंडे प्राथमिक शाळेने उत्कृष्ट कला सादरीकरण करत प्रथम पारितोषिकावर आपले नाव कोरले.

या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष भीमराव धोंडे व सौ. दमयंतीताई धोंडे (माई) यांच्या हस्ते शाळेला सन्मानचिन्ह व १५ हजार रुपये रोख बक्षीस प्रदान करण्यात आले. या कला सादरीकरणात शाळेतील ४८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे प्रभावी दर्शन घडविणारे हे सादरीकरण परीक्षकांच्या विशेष पसंतीस उतरले. या यशाबद्दल युवा नेते डॉ. अजय दादा धोंडे, तसेच संस्थेचे सर्व प्रशासन अधिकारी, शाळेचे मुख्याध्यापक ज्ञानेश्वर राऊत, शिक्षकवृंद, पालक व ग्रामस्थांकडून विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

या कार्यक्रमाची कोरिओग्राफी प्रमोद राऊत व विनोद विधाते यांनी केली.

## शेतकरी अपघातग्रस्तांसाठी वैद्यकीय सहाय्य निधी नियमांत शिथिलतेची आ. सुरेश धस यांची मागणी

आष्टी (प्रतिनिधी)

बीड जिल्हाधिकारी कार्यालयात आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाचे प्रमुख डॉ. चैतन्य कागदे यांच्यासोबत महत्त्वपूर्ण बैठक घेतली. या बैठकीत मतदारसंघातील गंभीर आजारग्रस्त रुग्णांना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्य निधीतून मदत मिळण्याबाबत तसेच निधीसाठी आवश्यक कागदपत्रे आणि प्रक्रियेत येणाऱ्या अडचणींवर सविस्तर चर्चा करण्यात आली.



ग्रामीण भागातील शेतकरी शेतीची कामे करत असताना ट्रॅक्टर, मळणी यंत्र, रोटावेटर, कडबा कुट्टी मशीन, ट्रॅक्टर ट्रॉली तसेच इतर शेतीयुक्त अवजारे वापरताना होणाऱ्या अपघातांमध्ये गंभीर जखमी होत आहेत. मात्र अशा अपघातांनंतर उपचारासाठी सध्या मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्य निधीतून मदत मिळत नसल्याची गंभीर बाब आमदार धस यांनी यावेळी निदर्शनास आणून दिली. त्यामुळे अनेक शेतकरी कुटुंबांवर आर्थिक संकट ओढावत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या पार्श्वभूमीवर शेतकरी अपघातग्रस्तांना तातडीची मदत मिळण्यासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्य निधीच्या नियमांमध्ये आवश्यक ती शिथिलता देण्याची गरज असल्याचे मत त्यांनी मांडले. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी तसेच मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाशी थेट संवाद साधून धोरणात्मक बदल करण्याबाबत सखोल चर्चा करण्यात आल्याची माहिती देण्यात आली. शेतकरी आणि ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी हा विषय प्राधान्याने मार्गी लावण्याचा ठाम निर्धार आमदार सुरेश धस यांनी व्यक्त केला.

## जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ शाळेत बालिका दिन साजरा

केज/प्रतिनिधी

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ केंद्र केज मुलांची ता.केज या शाळेत क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस या शाळेतील इ.६ वी व इ.७ वी वर्गातील विद्यार्थीनींनी पुष्पहार अर्पण करून पुजन करून अभिवादन केले. क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांचा जन्म महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील नायगाव येथे ३ जानेवारी १८३१ रोजी झाला.वडील खंडोजी नेवसे पाटील हे होते व आईचे नाव लक्ष्मीबाई असे होते. क्रांतीज्योती ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले यांच्या ९ व्यावर्षी महात्मा ज्योतिबा फुले यांच्याशी विवाह झाला.त्या महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणा चळवळीतील एक महत्त्वाची व्यक्ती होत्या. त्यांनी १ जानेवारी १८४८ रोजी पुण्यात भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा सुरू केली.त्यांचा १० मार्च १८९७ रोजी मृत्यू झाला.३ जानेवारी



हा दिवस बालिका दिन, महिलामुक्ती दिन म्हणून साजरा केला जातो.त्यांनी समाज सुधारणा चळवळ करुन अनेक उत्कृष्ट कामगिरी केली.आजही समाजाने त्यांच्या कार्याचा आदर्श घेण्यासारखे त्यांनी उत्कृष्ट कार्य केले.असे आपल्या प्रास्ताविकात जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ केंद्र केज मुलांची ता.केज शाळेचे अपग्रेड मुख्याध्यापक श्री. राजाभाऊ दत्तात्रय कदम यांनी सांगितले.यावेळी या शाळेतील आदर्शप्राथमिक पदवीधर शिक्षक डॉ.श्री. रामकिशन ग्यानबा मुळे सर,श्री.आकाश दत्तु लोंढे सर,राहुल बजरंग बचुटे सर,प्राथमिक पदवीधर शिक्षक श्री.संदीप मेघराज ठोंबरे सर,श्री.आबासाहेब तुळशिराम धपाटे सर, श्रीमती भोरे निलावती आनंदराव मॅडम,श्रीमती उटीकर अंजलीगोविंदराव मॅडम,ट्रेनी शिक्षिका रोहिणी श्रीधर काळे - थोरात मॅडम यांनी सविस्तर माहिती दिली.या कार्यक्रमात इ.१ ली ७ वी वर्गातील या शाळेतील जवळपास ८०विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.तसेच काही विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी विद्यार्थिनींनी क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या जीवनावर आधारित अनेक गीत सादर केली.या कार्यक्रमा निमित्त रांगोळी स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा घेण्यात येऊन प्रोत्साहनपर बक्षीस वितरण करण्यात आले. या कार्यक्रमास यागावचे सरपंच श्री अविनाश पांचाळ,उपसरपंच,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्षा सौ.शालु विजय थोरात,उपाध्यक्षा सौ. अश्विनी श्रीकांत थोरात, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य सौ.संध्या अशोक थोरात,ग्रामपंचायत सदस्य,शाळा व्यवस्थापन समिती सदस्य,शिक्षण प्रेमी नागरिक ,अंगणवाडी ताई,मदतनिस,पीएम पोषण शक्ती निर्माण कामगार सुवर्णमाला पवार,अनिता पवार, मातापालक असे अनेक गावकरी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन इ ७ वी वर्गातील आर्या अमोल थोरात या विद्यार्थीनींने अतिउत्कृष्ट केले.आभार पद्मजा थोरात या विद्यार्थिनीने मानले.

## आष्टी तालुका पत्रकार संघाची नवी कार्यकारिणी बिनविरोध जाहीर







आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी तालुका पत्रकार संघाची सर्वसाधारण बैठक दर्पण दिनाचे औचित्य साधून दि. ६ जानेवारी २०२६ रोजी उत्साहपूर्ण व सकारात्मक वातावरणात पार पडली. या बैठकीत संघाच्या नव्या कार्यकारिणीची निवड एकमताने करण्यात आली. अध्यक्षपदी संतोष सानप, उपाध्यक्षपदी मनोज पोकळे व शरद रेडेकर, सचिवपदी प्रा. डॉ. विनोद ढोबळे तर कार्याध्यक्षपदी भीमराव गुरव यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे उपस्थित पत्रकार बांधवांनी टाळ्यांच्या गजरात अभिनंदन केले. ही निवड प्रक्रिया ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्रबुद्धे, ज्येष्ठ पत्रकार तथा उपसंपादक उत्तमराव बोडखे, दत्ताभाऊ काकडे, ज्येष्ठ पत्रकार सिताराम पोकळे तसेच मावळते अध्यक्ष प्रवीण पोकळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी संघाच्या आतापर्यंतच्या वाटचालीचा आढावा घेत पुढील दिशा व धोरणांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी बोलताना नवनिर्वाचित अध्यक्ष संतोष सानप यांनी सांगितले की, तालुक्यातील पत्रकारांच्या समस्या, अडचणी, हक्क व सुरक्षिततेसाठी पत्रकार संघाच्या माध्यमातून ठामपणे आवाज उठवला जाईल. पत्रकारितेतील नीतिमूल्ये जपत सामाजिक बांधिलकी अधिक सक्षम करण्यासाठी संघ सातत्याने कार्यरत राहील. लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून पत्रकारांची जबाबदारी अधिक प्रभावीपणे पार पाडण्याचा प्रयत्न केला जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

उपाध्यक्ष मनोज पोकळे व शरद रेडेकर यांनी संघटनेत सर्व पत्रकारांना सोबत घेऊन एकसंघपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. सचिव प्रा. डॉ. विनोद ढोबळे यांनी संघाच्या कामकाजात पारदर्शकता ठेवून पत्रकारांसाठी प्रशिक्षण, मार्गदर्शन व विविध उपक्रम राबवले जातील, असे स्पष्ट केले. तर कार्याध्यक्ष भीमराव गुरव (आण्णा) यांनी संघ अधिक सक्रिय, सक्षम व प्रभावी करण्यासाठी प्रयत्नशील राहण्याची ग्वाही दिली.

या बैठकीत तालुक्यातील पत्रकारितेची गुणवत्ता वाढवणे, नवोदित पत्रकारांना मार्गदर्शन करणे, सामाजिक प्रश्नांवर प्रभावी लेखन करणे तसेच पत्रकारांच्या एकजुटीला बळकटी देणे, याबाबत सखोल चर्चा करण्यात आली. याप्रसंगी ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्रबुद्धे यांनी मनोगत व्यक्त करत नव्या कार्यकारिणीला शुभेच्छा दिल्या. या वेळी शरद तळेकर, रघुनाथ कर्डिले, गणेश दळवी, सचिन रानडे यांच्यासह तालुक्यातील पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. नव्या कार्यकारिणीच्या निवडीमुळे आष्टी तालुका पत्रकार संघ अधिक सक्षम होऊन पत्रकारांच्या हितासाठी भक्कमपणे कार्य करेल, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली. कार्यक्रमाच्या शेवटी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा पत्रकार संघाच्या वतीने शाल व फेटा बांधून सत्कार करण्यात आला.



दर्पण दिनाचे औचित्य साधून अंबाजोगाई शहरातील सर्व पत्रकार बांधवांच्या वतीने

## दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन

अंबाजोगाई (प्रतिनिधी )

६ जानेवारी दर्पण दिन अर्थात पत्रकारांचा अतिशय आनंद उत्सवाचा दिवस आणि याच ६ जानेवारी या दर्पण दिनाचे औचित्य साधून आज अंबाजोगाई शहरातील सर्व पत्रकार बांधवांच्या वतीने दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. प्रतिवर्षा प्रमाणे याही वर्षी ६ जानेवारी रोजी दर्पण दिनाचे औचित्य येथील बाळशास्त्री जांभेकर पत्रकार कक्षात शहरातील पत्रकारांच्या वतीने विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी दर्पण कार बाळ शास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पांजलीअर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी दिवंगत पत्रकार नागनाथ आप्पा वारद यांना पत्रकारांच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्याचबरोबर लोखंडी सावरगाव नजीक झालेल्या ट्रॅक्टर व ऑटोरिक्षा अपघातात अपघातग्रस्तांना तातडीची मदत पोहोचवणारे पत्रकार शेख फिरोज यांचाही सर्वांच्या वतीने सत्कार करण्यात आला. याचं कार्यक्रमाचे औचित्य साधून सर्व पत्रकार बांधवांचे हस्ते ऋतुचक्र या दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले.

या कार्यक्रम प्रसंगी ज्येष्ठ पत्रकार अविनाश मुडेगावकर, शिवकुमार निर्मळे, प्रदीपजी तरकसे, मराठी पत्रकार परिषदेचे हल्ला विरोधी कृती समितीचे बीड जिल्हा निमंत्रण दत्तात्रय आंबेकर, तालुका अध्यक्ष प्रशांत लाटकर, सचिव विरेंद्र गुप्ता, हल्ला विरोधी कृषी समिती तालुका निमंत्रक अशोक दळवे, कार्याध्यक्ष पूनमचंद परदेशी, वसुदेव शिंदे, अंबाजोगाई तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष महादेव गोरे, रोहिदास हातागळे, व्यंकटेश जोशी, डिजिटल मीडिया तालुकाध्यक्ष अभिजित लोमटे, कार्याध्यक्ष सतीश मोरे, मोहंमद शेख फैजान, सय्यद नईम, शेख फिरोज, गोविंद सूर्यवंशी, अशोक कोळी, प्रशांत मस्के, आरेफ सिद्दिकी, बाळासाहेब शेंडगे, यांची प्रमुख उपस्थिती होती.यां कार्यक्रमाचे सूत्रसंचलन विरेंद्र गुप्ता यांनी केले.

## दर्पण दिनानिमित्त आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचा रक्तदानातून सामाजिक संदेश; ५४ रक्तदात्यांचा उत्स्फूर्त सहभाग

आष्टी (प्रतिनिधी)

'पत्रकारितेचे जनक दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त (६ जानेवारी) साजरा करण्यात येणाऱ्या दर्पण दिना'च्या निमित्ताने आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने यावर्षी एक स्तुत्य सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत गणपती लिमटाका मंदिर, आष्टी येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात तब्बल ५४ रक्तदात्यांनी स्वयंस्फूर्तीने रक्तदान करून समाजाप्रती आपली बांधिलकी अधोरेखित केली. यावेळी ग्रामीण रुग्णालयाचे अधिक्षक डॉ. रामदास मोराळे, डॉ. श्रीम. सुवर्णा मोराळे हे उपस्थित होते.



आष्टी तालुका युवा पत्रकार संघ गेल्या अनेक वर्षांपासून विविध सामाजिक व प्रेरणादायी उपक्रम राबवत आहे. दरवर्षी ८ मार्च रोजी जागतिक महिला दिनानिमित्त कर्तृत्वान महिलांचा झुंजार नारी पुरस्कार देऊन समाजातील उल्लेखनीय महिलांचा सन्मान केला जातो. तसेच, दर्पण दिनानिमित्त गेल्या तीन वर्षांपासून पत्रकारितेसह समाजासाठी भरीव योगदान देणाऱ्या ज्येष्ठ पत्रकारांचा गौरव करण्यात येतो. याच परंपरेला पुढे नेत यावर्षी सामाजिक जागृतीला अधिक चालना देण्याच्या उद्देशाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, उपाध्यक्ष जावेद पठाण, सचिव गहिनीनाथ पाचबैल यांच्यासह ज्येष्ठ पत्रकार राजेंद्र लाड, निसार शेख, किशोर निकाळजे, अक्षय विधाते, संतोष नागरगोजे, समीर शेख, सोपान पगारे, प्रेम पवळ, अतुल जवणे, मारुती सत्रे, आदिनाथ ठोंबरे, ओंकार कदम, संस्कार लाड यांनी परिश्रम घेतले. तांत्रिक व वैद्यकीय बाजू साईसेवा ब्लड सेंटरचे संचालक अजित जगताप, डॉ. बांगर तसेच परिचारिका पायल वैद्य, जमुना उगले, प्रतिक्षा मदनकर, रागिनी टेंभुरकर, पियुष खेबडे, निकिता मोरे व मनिषा सामृतवार यांनी समर्थपणे सांभाळली. संपूर्ण कार्यक्रम शांततापूर्ण व सुव्यवस्थित वातावरणात पार पडला. सामाजिक कार्यातून दर्पण दिन साजरा करण्याचा आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचा हेतू यशस्वी ठरल्याने सर्व स्तरांतून या उपक्रमाचे कौतुक करण्यात येत आहे.

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा केवड येथे जेष्ठ पत्रकार दिलीपराव सपाटे यांची सदिच्छा भेट शिक्षकांनी केले स्वागत

केज ।प्रतिनिधी

केज तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा केवड येथे श्री.दिलीपराव सपाटे (मुंबई मंत्रालय, पत्रकार) यांनी नुकतीच भेट देऊन शाळेच्या अडचणी जाणून घेतल्या. यावेळी त्यांनी शाळेसाठी किचन रूम तसेच संरक्षण भिंत उभारून देण्याचे आश्वासन दिले.यासोबतच शाळेसाठी रोख रक्कम २५०० रुपये देऊन शाळेच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले.या शालेय भेटी प्रसंगी ग्रामसेवक श्री.जुगदर, सरपंच श्री.बाळासाहेब सत्वधर,ग्रामपंचायत सदस्य श्री.रमेश पवार, मुख्याध्यापक पठाण मुखतार सर,सहशिक्षिका श्रीमती हंगे सुवर्णमाला, ग्रामस्थ व पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमा दरम्यान उपस्थित मान्यवरांचा शाळेच्या वतीने



सत्कार करण्यात आला.शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी व गुणवत्ता वाढीसाठी पालकांनी सक्रियसहभाग घ्यावा,असे आवाहन यावेळी करण्यात आले.या भेटीमुळे शाळेच्या विकासाला निश्चितच चालना मिळेल,असा विश्वास ग्रामस्थ व पालकांनी व्यक्त केला.

# सौर कृषी पंप योजनेतील गोंधळावर आ.हिकमतदादा उढाण आक्रमक

## शेतकऱ्यांची फसवणूक खपवून घेणार नाही ;अधिकाऱ्यांना कडक इशारा



घनसावंगी ।प्रतिनिधी

घनसावंगी मतदारसंघातील सौर कृषी पंप योजनेबाबत गेल्या अनेक दिवसांपासून शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या गंभीर समस्यांचा पाढा आज थेट अधिकाऱ्यांसमोर उघड झाला. शेतकऱ्यांच्या प्रश्नांना तातडीचा न्याय मिळावा यासाठी आमदार हिकमतदादा उढाण यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना जनसंपर्क कार्यालय घनसावंगी येथे विशेष समस्या निवारण मेळावा आयोजित करण्यात आला होता.

या मेळाव्यात महावितरण तसेच सौर कृषी पंप योजनेशी संबंधित विविध यंत्रणांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. घनसावंगी मतदारसंघातील शेतकरी मोठ्या संख्येने मेळाव्यास उपस्थित राहून त्यांनी आपल्या व्यथा थेट मांडल्या.शेतकऱ्यांनी स्पष्टपणे सांगितले की मागेल त्याला सोलार या योजनेच्या नावाखाली काही ठिकाणी मध्यस्थांकडून बेकायदेशीरपणे पैसे उकळले जात आहेत. अनेक पात्र शेतकऱ्यांचे अर्ज कोणतेही कारण न देता रिजेक्ट करण्यात आले असून काही शेतकऱ्यांचे अनुदान मंजूर होऊनही अद्याप त्यांच्या खात्यात जमा झालेले नाही.कागदपत्रांची पूर्तता करूनही शेतकऱ्यांना कार्यालयांचे चकरा माराव्या लागत असल्याने संताप व्यक्त करण्यात आला.

या सर्व प्रकारांची आमदार हिकमतदादा उढाण यांनी तीव्र शब्दांत दखल घेतली. शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत हलगर्जीपणा, टाळाटाळ आणि दिरंगाई अजिबात खपवून घेतली जाणार नाही. योजनेच्या नावाखाली शेतकऱ्यांची फसवणूक होत असेल तर त्यास जबाबदार असणाऱ्यांवर कठोर कारवाई झालीच पाहिजे असा ठाम इशारा त्यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना दिला.

आमदार उढाण यांनी प्रत्येक तक्रारीची स्वतंत्र नोंद घेऊन ठराविक कालमर्यादेत समस्यांचे निराकरण करण्याचे स्पष्ट आदेश दिले. प्रलंबित अर्ज, रिजेक्ट केलेले फॉर्म अपूर्ण अनुदान प्रकरणांचा सखोल आढावा घेऊन तातडीने मार्ग काढण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

यावेळी बोलताना आमदार हिकमतदादा उढाण यांनी ठाम शब्दांत इशारा दिला की जर शेतकऱ्यांचे प्रश्न वेळेत मार्गी लागले नाहीत तर शेतकऱ्यांच्या न्यायासाठी रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करण्यात येईल. शेतकऱ्यांच्या हितासाठी कोणतीही तडजोड केली जाणार नाही.या समस्या निवारण मेळाव्यास सौर कृषी पंप योजनेशी संबंधित कार्यकारी अभियंता श्री. मठपती उपकार्यकारी अभियंता श्री. पवार,श्री.सोनटक्के,श्री.पवार यांच्यासह सर्व संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी,शिवसेनेचे नेते व पदाधिकारी,शिवसैनिक तसेच शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# घनसावंगीत साकारणार भव्य पत्रकार भवन;आमदार हिकमत उढाण यांची मोठी घोषणा

घनसावंगी ।प्रतिनिधी

दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त पत्रकार दिन घनसावंगी येथे पत्रकारांचा गौरव करण्यात आला.या सोहळ्यात आमदार हिकमत उढाण यांनी तालुक्यातील पत्रकारांना एक मोठी भेट दिली आहे.घनसावंगी शहरात जागा उपलब्ध करून देऊन लवकरच एक भव्य आणि सुसज्ज पत्रकार भवन उभारले जाईल अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.पत्रकार दिनी सन्मान सोहळा उत्साहात

मंगळवारी दि.६ जानेवारी रोजी आमदार हिकमत उढाण यांच्या संपर्क कार्यालयात तालुक्यातील पत्रकारांसाठी विशेष सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी तालुक्यातील ज्येष्ठ व तरुण पत्रकारांनी मोठी उपस्थिती लावली होती. आमदारांच्या हस्ते सर्व पत्रकारांचा यथोचित गौरव करण्यात आला.प्रलंबित मागणीला मिळाला हिरवा कंदील

कार्यक्रमादरम्यान आमदार उढाण यांनी पत्रकारांशी मनमोकळा संवाद साधला. यावेळी पत्रकारांनी त्यांच्या विविध समस्या अडचणी आणि विशेषत अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या तालुका पत्रकार भवना चा मुद्दा मांडला. यावर सकारात्मक प्रतिसाद देत आमदारांनी तातडीने कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.

पत्रकार समाजाचा आरसा आहेत.त्यांच्यासाठी हे भवन केवळ इमारत नसेल तर ते संवाद प्रशिक्षण आणि सामाजिक कार्याचे एक प्रभावी केंद्र ठरेल.यासाठी आवश्यक असलेली जागा शोधून तातडीने निधी उपलब्ध करून दिला जाईल.आमदार हिकमत उढाण, दिग्गजांची उपस्थिती या सोहळ्याला ज्येष्ठ पत्रकार सर्जेराव गिऱ्हे प्रल्हाद साळवे, ओमप्रकाश उढाण, व्हॉईस ऑफ मीडिया चे तालुकाध्यक्ष मारोती सावंत,युनूस भाई, किशोर शिंदे, भाऊसाहेब जाधव, गणेश जाधव,संतोष तळपे, सुरेश पोटे, राजेंद्र बिडे, हरिभाऊ गिराम यांच्यासह तालुक्यातील बहुसंख्य पत्रकार उपस्थित होते. पत्रकारांमध्ये समाधानाचे वातावरण गेल्या अनेक वर्षांपासून पत्रकार भवनाची मागणी केली जात होती. आमदारांनी दिलेल्या या ठाम ग्वाहीमुळे तालुक्यातील पत्रकार वर्गात आनंदाचे वातावरण असून हा निर्णय जिल्ह्यासाठी एक आदर्श ठरेल, अशी भावना व्यक्त केली जात आहे.

# मराठी पत्रकार दिनानिमित्त अंबड पोलीस ठाण्याच्या वतीने पत्रकारांचा सन्मान



अंबड ।प्रतिनिधी

दि.६ जानेवारी रोजी मराठी पत्रकार दिनाचे औचित्य साधून अंबड पोलीस ठाण्याच्या वतीने पत्रकार सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात अंबड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष घाडगे यांच्या हस्ते तालुक्यातील पत्रकारांचा सन्मान करण्यात आला.या सन्मान सोहळ्यात पत्रकारांना लेखणी कलम व डायरी प्रदान करून गौरव करण्यात आला तसेच मराठी पत्रकार दिनानिमित्त शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी बोलताना पोलीस निरीक्षक संतोष घाडगे यांनी पत्रकार हे समाजातील चौथा स्तंभ असून, कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पत्रकारांचे सहकार्य अत्यंत मोलाचे असल्याचे प्रतिपादन केले.

समाजातील विविध प्रश्न जनतेच्या समस्या तसेच प्रशासनातील घडामोडी वस्तुनिष्ठ व निर्भीडपणे मांडण्याचे महत्त्वाचे कार्य पत्रकार करतात. पोलीस प्रशासन व पत्रकार यांच्यातील समन्वय अधिक दृढ व्हावा या उद्देशाने हा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.या कार्यक्रमास अंबड पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी यांच्यासह पत्रकार संतोष जिगे, अशोक डोरले, शेख फारुक, अनिल भालेकर, बळीराम राऊत, ज्ञानेश्वर साळुंके, अशोक खरात, नाजीम सय्यद, आकाश जळके, गणेश सपकाळ, जहीर शेख, सुरेश भावले, नासेर चाऊस आदी पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.पोलीस प्रशासनाकडून मिळालेल्या या सन्मानामुळे पत्रकारांमध्ये समाधान व्यक्त होत असून, पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष जिगे यांनी पत्रकारांच्या वतीने पोलीस प्रशासनाचे आभार मानले.

# खंडणीखोर व प्रीपेड रिचार्जवर चालणाऱ्यांनी आ. सुरेश धस व कुटुंबीयांची बदनामी थांबवावी - यशवंत खंडागळे

आष्टी (प्रतिनिधी)

सध्या सोशल मीडियाच्या माध्यमातून आ. सुरेश धस व त्यांच्या कुटुंबीयांची जाणीवपूर्वक बदनामी करण्याचा प्रयत्न सुरू असून हा प्रकार तात्काळ थांबवण्यात यावा, अशी ठाम मागणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरमचे जिल्हाध्यक्ष यशवंत खंडागळे यांनी केली. या बदनामीच्या निषेधार्थ त्यांच्या नेतृत्वाखाली दि. ५ जानेवारी २०२६ रोजी आष्टी येथे पाळीव प्राण्यांसह टोनगे मोर्चाचे आयोजन करण्यात आले.

या अनोख्या आंदोलनात नंदीबैल, टोणगे (रेडा) आदी प्राण्यांचा समावेश करण्यात आला होता. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरमचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. मोर्चामुळे परिसरात नागरिकांचे लक्ष वेधले गेले. मोर्चादरम्यान बोलताना यशवंत खंडागळे म्हणाले की, लोकनेते, दीन - दलितांचे कैवारी तसेच दलित, आदिवासी व भटके - विमुक्त समाजाचे आधारस्तंभ असलेले आ. सुरेश धस व त्यांच्या कुटुंबीयांवर खंडणीखोर व प्रीपेड रिचार्जवर चालणाऱ्या काही कवडीमोल लोकांकडून कोणताही पुरावा नसताना बिनबुडाचे आरोप केले जात आहेत. स्वतःची प्रसिद्धी मिळवण्यासाठी सोशल मीडियावर मुलाखती देऊन लोकप्रतिनिधी व त्यांच्या कुटुंबीयांची प्रतिमा मलीन करण्याचा हा प्रकार अत्यंत निंदनीय आहे.



या प्रकरणी बिनबुडाचे आरोप करणाऱ्यांची तात्काळ चौकशी करून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात यावेत, तसेच लोकप्रतिनिधी व त्यांच्या कुटुंबीयांची होत असलेली बदनामी थांबवण्यात यावी, अशी मागणी त्यांनी प्रशासनाकडे केली. याबाबत आष्टी तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले.

यापुढील काळातही जर बदनामीचे प्रकार थांबले नाहीत, तर तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल आणि जशास तसे उत्तर देण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. या प्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरमचे तालुकाध्यक्ष गेनबा साळवे यांच्यासह संघटनेचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ६ जानेवारी - दर्पण दिन : मराठी पत्रकारितेचा आत्मा आणि समाजाचा आरसा

मराठी समाजाच्या वैचारिक इतिहासात सहा जानेवारी हा दिवस केवळ एका तारखेपुरता मर्यादित नाही ; तो विचार , विवेक आणि सत्यनिष्ठेच्या प्रदीर्घ प्रवासाचा मैलाचा दगड आहे . ६ जानेवारी १८३२ रोजी मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्र दर्पण प्रकाशित झाले आणि त्यातून मराठी पत्रकारितेचा औपचारिक जन्म झाला . या ऐतिहासिक कार्यामागे होते बाळशास्त्री जांभेकर - आधुनिक महाराष्ट्राच्या वैचारिक जडणघडणीचे शिल्पकार , समाजप्रबोधनाचे दीपस्तंभ आणि निर्भीड लेखणीचे आद्य पुरस्कर्ते .



दर्पण म्हणजे केवळ एक वृत्तपत्र नव्हते ; ते समाजाला स्वतःकडे पाहण्याचे साधन होते . अज्ञान , अंधश्रद्धा , सामाजिक अन्याय , जातिभेद , प्रशासकीय जुलूम आणि परकीय सत्तेची दडपशाही - या साऱ्यांवर प्रश्न विचारण्याची धैर्यशील परंपरा दर्पणने सुरू केली . त्या काळात इंग्रजी सत्तेखाली दबलेला समाज , शिक्षणापासून वंचित घटक आणि बदलाची आस धरलेली तरुण पिढी - या सर्वांना दर्पणने शब्द दिले . पत्रकारिता म्हणजे केवळ बातमी देणे नव्हे ; तर समाजाला जागं करणे , प्रश्न विचारायला शिकवणे आणि सत्याची बाजू ठामपणे मांडणे - ही जाणीव बाळशास्त्री जांभेकरांनी पहिल्याच पानावरून समाजाला दिली .

स्वातंत्र्यपूर्व काळात वृत्तपत्रे ही केवळ माहितीची साधने नव्हती ; ती स्वातंत्र्यलढ्याची शस्त्रे होती . लोकमान्य टिळकांचे केसरी आणि मराठा , गोपाळ गणेश आगरकरांचे सुधारक , महात्मा फुल्यांचे दीनबंधू , महात्मा गांधींचे यंग इंडिया आणि हरिजन , डॉ . बाबासाहेब आंबेडकरांचे मूकनायक , बहिष्कृत भारत आणि जनता - ही वृत्तपत्रे म्हणजे केवळ छापील कागद नव्हते ; ती विचारांची रणमैदाने होती . या वृत्तपत्रांनी जातिभेदाला आव्हान दिले , स्त्रीशिक्षणाची मशाल पेटवली , शोषितांचा आवाज बनले आणि स्वातंत्र्याची जाणीव सामान्य माणसाच्या घरापर्यंत पोहोचवली .

त्या काळात वृत्तपत्र वाचणे म्हणजे एक सामाजिक कृती होती . गावात एखादे वृत्तपत्र आले की ते चौकात , वाचनालयात किंवा चहाच्या टपरीवर वाचले जाई . एकजण वाचायचा आणि अनेक जण ऐकायचे . शब्द पसरायचे , विचार रुजायचे आणि समाज हलायचा . वृत्तपत्रांनी भारतीय समाजमन घडवले , राजकीय जागृती निर्माण केली आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचे बळ दिले .स्वातंत्र्यानंतर पत्रकारितेचा चेहरामोहरा बदलत गेला . प्रशासन , विकास , शिक्षण , आरोग्य , शेती , उद्योग , अर्थकारण , न्यायव्यवस्था - या सर्व क्षेत्रांवर लक्ष ठेवणारी चौकशी पत्रकारिता विकसित झाली . ग्रामीण प्रश्न , दुष्काळ , पाणीटंचाई , शेतकरी आत्महत्या , कामगारांचे प्रश्न - हे विषय मुख्य प्रवाहात आणण्याचे मोठे काम वृत्तपत्रांनी केले . मराठी पत्रकारितेने समाजाशी असलेली नाळ टिकवून ठेवली .

आजच्या काळात माध्यमविश्व प्रचंड वेगाने बदलले आहे . छापील वृत्तपत्रांबरोबरच दूरचित्रवाणी , वृत्तवाहिन्या , डिजिटल माध्यमे , संकेतस्थळे , समाजमाध्यमे - माहितीचे असंख्य प्रवाह निर्माण झाले आहेत . भारतात सध्या सुमारे वीस हजारांहून अधिक नोंदणीकृत वृत्तपत्रे प्रकाशित होत आहेत . मराठी भाषेतील दैनिके आणि साप्ताहिकांची संख्या हजारोंच्या घरात आहे . वाचकसंख्या स्वरूप बदलत असली , तरी वृत्तपत्रांवरील विश्वास आजही टिकून आहे .

इलेक्ट्रॉनिक माध्यमांनी बातम्यांचा वेग वाढवला , तर डिजिटल माध्यमांनी पोहोच वाढवली . मात्र या वेगाच्या काळात सत्य , तपासणी आणि जबाबदारी यांचे महत्त्व अधिक वाढले आहे . अफवा , अर्धसत्य , सनसनाटीपणा आणि व्यावसायिक स्पर्धा - या आव्हानांमध्ये पत्रकारितेचा आत्मा जपणे ही आजची सर्वात मोठी गरज आहे .

दर्पण दिन आपल्याला आठवण करून देतो की पत्रकारिता ही केवळ व्यवसाय नाही ; ती एक सामाजिक बांधिलकी आहे . लेखणी ही तलवारीपेक्षा धारदार असते , पण तिचा वापर विवेकाने व्हायला हवा . सत्य , निर्भीडपणा , लोकहित आणि सामाजिक जबाबदारी - या मूल्यांवर उभी असलेली पत्रकारिताच समाजाचा खरा आरसा ठरते . बाळशास्त्री जांभेकरांनी पेटवलेली ही विचारांची ज्योत आजही मराठी पत्रकारितेतून उजळत आहे , आणि ती पुढील पिढ्यांपर्यंत अखंडपणे जपण्याची जबाबदारी आपली आहे .

आज दर्पणकडे पाहताना आपण स्वतःकडे पाहायला शिकले पाहिजे . आपण सत्यासाठी उभे राहतो का ? अन्यायावर प्रश्न विचारतो का ? दुर्बलांचा आवाज बनतो का ? या प्रश्नांची उत्तरेच दर्पण दिनाचा खरा अर्थ ठरवतात . कारण पत्रकारिता जिवंत असते तोपर्यंतच लोकशाही जिवंत राहते .

**-चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके**
तहसीलदार , बीड

# ठाण्यात अर्ज मागे घेणाऱ्या 'त्या' उमेदवारांविरोधात शिवसेना - मनसेची पोलीसांत धाव

## राजन विचारे आणि अविनाश जाधव यांनी श्रीनगर पोलिसांना दिले निवेदन

ठाणे (प्रतिनिधी)

महापालिका निवडणुकीत उमेदवारी अर्ज मागे घेत शिंदेंच्या साथिदारांना 'बिनविरोध' निवडुन येण्यास साह्य करणाऱ्या शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या तिन्ही उमेदवारांसह संबधित पोलीसावर गुन्हे दाखल करावेत. अशी मागणी शिवसेनेचे राजन विचारे आणि मनसे नेते अविनाश जाधव यांनी श्रीनगर पोलीसांकडे निवेदनाद्वारे केली आहे. यावर पोलिसांनी निवडणुक आयोगाकडून अहवाल आल्यानंतर कारवाई करण्याचे आश्वासित करण्यात आले. दरम्यान, पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांनाही यासंदर्भात अवगत करून तातडीची कारवाई करण्याची विनंती केल्याचेही विचारे व जाधव यांनी सांगितले. ठाणे महापालिका निवडणुकी दरम्यान शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने प्रभाग क्रमांक ५ 'ब' दादाभाऊ रेपाळे, प्रभाग क्रमांक १८ 'ब' च्या स्नेहा नांगरे आणि प्रभाग क्रमांक १८ 'ड' चे उमेदवार विक्रांत घाग ह्यांना पक्षातर्फे 'एबी' फॉर्म देऊन अधिकृत उमेदवारी घोषित केली होती. मात्र, तिघांनीही पक्षाला न कळविता परस्पर माघार घेत शिंदेंच्या साथीदारांना बिनविरोध निवडून येण्यास मदत केली. ही बाब राजन विचारे आणि अविनाश जाधव यांनी गांभिर्याने घेतली आहे. या अनुषंगाने रविवारी श्रीनगर पोलीस ठाण्यात या तिघा उमेदवारांविरोधात सेना - मनसेने निवेदन सादर करून तिघांवरही गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे. निवेदनात म्हटल्यानुसार, सत्ताधाऱ्यांनी सरकारी अधिकाऱ्यांना हाताशी धरून तसेच, पैशांचे आमिष दाखवून या तिघांना उमेदवारी अर्ज मागे घेण्यास भाग पाडले. यात एका पोलीस अधिकाऱ्याचाही समावेश असुन त्या पोलीसाने विक्रांत घाग या उमेदवाराला एकनाथ शिंदे यांच्या बंगल्यात नेले होते. या चित्रिकरणाचे पुरावे सोशल मिडिया तसेच सर्व प्रसार माध्यमांवरही झळकले आहेत. त्यामुळे, ही बाब गंभीर असुन एक प्रकारे पोलीस खात्यालाही लांच्छनास्पद आहे. किंबहुना, परस्पर माघार घेणाऱ्या उमेदवारांनी त्या - त्या प्रभागातील मतदारांशी केलेली ही प्रतारणा आहे. तेव्हा, सत्ताधारी व सरकारी यंत्रणांनी मतदारांना मतदानापासून वंचित ठेवून लोकशाहीच संपुष्टात आणली आहे. त्यामुळे निवडणुक अधिकाऱ्यांशी संगनमत करून सत्ताधाऱ्यांनी केलेल्या या गैरप्रकाराबद्दल नागरिकांच्या मनात प्रचंड असंतोष निर्माण झाल्याने संबधित पोलीसासह त्या तिन्ही उमेदवारांवर गुन्हा दाखल करावा. अन्यथा, अशा चुकीच्या पायंड्यामुळे लोकशाहीवरील विश्वास उडून नागरिकांच्या भावनांचा उद्रेक होईल.



# कमळाची काळजी तुम्ही घ्या, पुढील पाच वर्षे तुमची काळजी आम्ही घेऊ - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस





नांदेड जिल्हा प्रतिनिधी

येणाऱ्या १५ जानेवारी रोजी कमळ या चिन्हासमोरील बटण दाबून भारतीय जनता पार्टीच्या सर्व उमेदवारांना प्रचंड बहुमताने निवडून द्या. कमळाची काळजी तुम्ही घ्या, पुढील पाच वर्षे तुमची काळजी आम्ही घेऊ, असे आवाहन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका निवडणुकीसाठी भाजपच्या अधिकृत उमेदवारांच्या प्रचारार्थ शहरातील स्व. इंदिरा गांधी मैदानावर आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण, खासदार डॉ. अजित गुपछडे, आमदार श्रीजया चव्हाण, तुषार राठोड, भीमराव केराम, राजेश पवार, भाजप जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकतराव हंबर्डे, महानगराध्यक्ष चैतन्य बापू देशमुख यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. सभेचे प्रास्ताविक शीतल खंडीला यांनी केले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मागील ७० वर्षांत शहरी जनतेसाठी स्वतंत्र आणि ठोस विकास योजना तयार झाल्या नाहीत. शहरांमध्ये वाढती लोकसंख्या, झोपडपट्ट्या, पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन आणि गटार यांसारख्या समस्या निर्माण झाल्या. मात्र २०१४ नंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली शहरांच्या विकासासाठी अमृत योजना, प्रधानमंत्री आवास योजना यांसारख्या महत्त्वाकांक्षी योजना राबविण्यात आल्या.

नांदेड शहरासाठी हजारो कोटींचा निधी उपलब्ध करून देण्यात आला असून झोपडपट्टी धारकांना त्यांच्या जागेवरच मालकी हक्क देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. कच्च्या घरात राहणाऱ्यांना पक्के घर बांधण्यासाठी आर्थिक मदत दिली जाणार आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

शहरातील भूमिगत गटार योजनेसाठी ३५१ कोटी रुपये, पाणीपुरवठ्यासाठी १६८ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. कचऱ्यावर प्रक्रिया करून स्वच्छ नांदेड घडविण्याचा संकल्प असल्याचे त्यांनी सांगितले. समृद्धी महामार्गाला नांदेड जोडण्याचा प्रयत्न सुरू असून त्यामुळे औद्योगिक विकासाला मोठी चालना मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.महापौर भाजपाचाच होणार असून भाजपचा संकल्पनामा पूर्ण केल्याशिवाय आम्ही थांबणार नाही, असे ठाम मत व्यक्त करत मुख्यमंत्री फडणवीस यांनी मतदारांना भाजपच्या बाजूने मतदान करण्याचे आवाहन केले.



## इंजि.पवनकुमार कांबळे यांच्या स्मरणार्थ अपंग मुलांना शैक्षणिक साहित्य व फळ वाटप

मुखेड ।प्रतिनिधी

इंजि.पवनकुमार कांबळे यांच्या स्मरणार्थ शहरातील एक शांत, संयमी व सरळमार्गी जिवन जगणारे वार्ताहर ड.मिलिंद कांबळे व त्यांच्या परिवाराच्या वतीने मौजे आखरगा येथील माजी सरपंच माधवराव होनमाने पत्रकार रियाज शेख, पत्रकार अजित पवार, नारायणराव अमृतवार, तसेच भिमराव कांबळे येवतीकर यांच्या उपस्थितीत सोमवार दि.५/१ /२०२६ रोजी शहरातील यशवंतराव चव्हाण निवासी अपंग विद्यालयातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व फळ वाटप करण्यात आले.

निसर्गाने दिलेल्या अनमोल आयुष्यातील आठ ते नऊ वर्षे शिक्षणासाठी आपल्या परिवारापासून दूर राहून अतिशय जिद्द व मेहनतीने शिक्षण पुर्ण करून नोकरीच्या नंतर आपल्या परिवाराचा आधार बनण्याची आशा बाळगणारे इंजि.पवनकुमार कांबळे यांनी उच्च शिक्षणाची तपशा पुर्ण करतच ीींरीरीळ या नृत्यकला शिकवून तिच्या अंगी असलेल्या हरहुन्नरी कलेला वृद्धिंगत केले पण निसर्गाच्या आघातामुळे आपला परिवार सोडून अचानक या जगाचा निरोप घ्यावा लागला. अशा आपल्या गुणी सुपुत्राचे नाव अजरामर ठेवण्याच्या उद्देशाने वार्ताहर मिलिंद कांबळे यांनी ४ जानेवारी या आपल्या दिवंगत मुलाच्या जन्मदिनाचे औचित्य साधून सोमवार दि.५/१/२०२६ रोजी शहरातील यशवंतराव चव्हाण निवासी अपंग विद्यालयातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व फळ वाटप करून एक सामाजिक उपक्रम राबवला.यावेळी सदर अपंग विद्यालयाचे संचालक चंद्रकांत घाटे बिल्लाळीकर यांचे सुपुत्र तथा संस्थेचे ट्रस्टी डॉ.संतोष घाटे, अधिक्षक देविदास बिजलीकर, शिपाई विजय बसवे, संतोष गवाले, माधव घाटे व मदतनीस रमाबाई गवलवाड यांच्यासह विद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनी व पालकांची उपस्थिती होती.



## पोलीस स्थापना दिनानिमित्त ग्रामीण पोलीस स्टेशन येथे विध्यार्थ्यांना मार्गदर्शन

नवीन नांदेड ।प्रतिनिधी

पोलीस स्थापना दिनानिमित्त पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व पोलीस स्टेशन येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते , यावेळी बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना ग्रामीण पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या वतीने पोलीस स्टेशन येथील विविध कामकाजाची माहिती देण्यात आली.

पोलीस स्थापना दिनानिमित्त पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण हद्दीतील काकांडी येथील युवा मिलिटरी अकॅडमी येथे दि ५ जानेवारी रोजी बारावी उत्तीर्ण बेरोजगार विद्यार्थ्यांना मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते ,यात पोलीस भरती विषयक नियम व तरतुदी बाबत दुय्यम पोलीस निरीक्षक बाळासाहेब रोकडे व प्र.पोलीस उपनिरीक्षक स्वप्निल सोळंके यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

तर पोलिस स्टेशन येथे शिवाजी विद्यालय येथील एन. सी. सी.च्या विद्यार्थ्यांना कामकाजाची माहिती देऊन शस्त्र कशी चालविण्यात येते याचे प्रशिक्षण देण्यात आले, यावेळी पोलीस अंमलदार व एन.सी. सीचे शिक्षक भोसीकर यांची उपस्थिती होती.

# अल्पवयीन वाहनचालकांवर कडक कारवाईचा इशारा

### पालकांची जबाबदारी वाढली ; नियम मोडल्यास पालकांवरही गुन्हे दाखल होणार

किनवट । किनवट शहर व परिसरात अल्पवयीन मुले वाहन चालवत असल्याचे प्रकार वाढत असल्याने किनवट पोलीस स्टेशनच्या वतीने गंभीर दखल घेण्यात आली आहे. अनेक शाळा व कोचिंग क्लासेसमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे पालक आपल्या मुलांना १८ वर्षे पूर्ण झालेली नसतानाही व वाहन चालविण्याचा परवाना नसतानाही दुचाकी व अन्य वाहने देत असल्याचे निदर्शनास आले आहे. ही बाब पूर्णपणे बेकायदेशीर व बेजबाबदारपणाची असून, यापुढे अशा प्रकारांना मुळीच खपवून घेतले जाणार नाही, असा इशारा किनवट पोलीस प्रशासनाने एका पत्रका द्वारे दिला आहे.

अल्पवयीन मुलांनी वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्यास केवळ मुलांवरच नव्हे तर संबंधित पालकांनाही दोषी धरले जाणार असून, त्यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता, मोटार वाहन कायद्यातील कलम ३, ४, ५, १८०, १८१ तसेच जुवेनाईल जस्टीस अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत, असे स्पष्ट करण्यात आले आहे.पोलीस प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, अल्पवयीन मुलांनी ५० सीसी पेक्षा जास्त क्षमतेचे वाहन चालविल्यास त्यासाठी तब्बल २५ हजार रुपयांचा दंड आकारला जाऊ शकतो. तसेच चालक, वाहनमालक व पालकांना तीन वर्षांपर्यंत सश्रम कारावासाची शिक्षा होण्याची तरतूद कायद्यात आहे. अपघात झाल्यास संबंधित वाहनाचा इन्शुरन्स क्लेम देखील नाकारला जातो, हेही पोलीस प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

गुन्हा दाखल झाल्यास त्या अल्पवयीन मुलांना भविष्यात नोकरी, पासपोर्ट, चारित्र्य प्रमाणपत्र आदी बाबींमध्ये मोठ्या अडचणींचा सामना करावा लागू शकतो. तसेच दंडात्मक कारवाई झाल्यास संबंधित मुला-मुलींना २५ वर्षांचे वय पूर्ण होईपर्यंत वाहन परवाना मिळणार नाही, किंवा किमान एक वर्षासाठी वाहन नोंदणी रद्द केली जाऊ शकते, अशी माहिती देण्यात आली आहे.

यामुळे किनवट पोलीस स्टेशनच्या वतीने सर्व पालकांना कळकळीचे आवाहन करण्यात आले आहे की, त्यांनी आपल्या अल्पवयीन पाल्यांच्या हाती कोणत्याही प्रकारचे वाहन देऊ नये व त्यांच्या जीवाशी खेळ करू नये. अल्पवयीन मुलांना वाहन चालवू देण्याऐवजी सायकल किंवा ई-सायकल हा सुरक्षित पर्याय उपलब्ध करून देण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.याशिवाय, किनवट शहरात प्रवासी वाहतूक करणाऱ्या ऑटो रिक्षा चालकांनी नेहमी चालक परवाना, वाहनाची आर.सी. बुक व इन्शुरन्सची कागदपत्रे सोबत ठेवणे बंधनकारक असल्याचे सांगण्यात आले आहे. तसेच शहरात मोटारसायकल व बुलेट धारकांकडून मर्यादेपेक्षा जास्त आवाज करणाऱ्या सायलेंसरचा वापर होत असल्याचे आढळून आले असून, यापुढे अशा वाहनांवर थेट दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे.

विनानंबर प्लेट किंवा पासिंग क्रमांक नसलेल्या वाहनांवरही कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. शहरातील वाहनधारक व व्यापाऱ्यांनी रस्त्यावर अडथळा निर्माण होईल अशा पद्धतीने पार्किंग न करता, नियमाप्रमाणे पार्किंग करून वाहतूक सुरळीत ठेवावी, असे आवाहन करण्यात आले आहे. यापुढे किनवट पोलीस स्टेशनच्या हद्दीत वारंवार विशेष मोहिमा राबवून वरील सर्व सूचनांच्या अनुषंगाने कठोर कारवाई करण्यात येईल, अशी माहिती पोलीस निरीक्षक गणेश कराड, पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन किनवट (जि. नांदेड) यांनी दिली आहे.

# दोन वर्षांच्या चिमुकल्यासह पित्याची विहिरीत उडी घेऊन आत्महत्या ; दहेली परिसर हादरला

किनवट ।प्रतिनिधी

तालुक्यातील दहेली (ता. किनवट) परिसरात दोन वर्षांच्या चिमुकल्यासह एका तरुण पित्याने विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना घडल्याने संपूर्ण परिसरात एकच खळबळ उडाली आहे. या घटनेत विक्रम सुरेश मारशेटवार (वय ३०) व त्यांचा दोन वर्षांचा मुलगा शिवाजी विक्रम मारशेटवार यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

ही घटना ५ जानेवारी रोजी सायंकाळी ६ वाजेपासून ते ६ जानेवारी रोजी सकाळी ६ वाजेदरम्यान घडल्याचे प्राथमिक




तपासातून स्पष्ट झाले आहे. दहेली येथील रहिवासी असलेले विक्रम मारशेटवार यांनी आपल्या दोन वर्षांच्या मुलासह गावालगत असलेल्या राजेश संटी दिसलवार यांच्या शेतातील विहिरीत उडी घेऊन जीवन संपविल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

सकाळी या घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. घटनेची माहिती मिळताच सिंदखेड पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. विहिरीतून दोन्ही मृतदेह बाहेर काढून पंचनामा करण्यात आला.या प्रकरणी सिंदखेड पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून, ठाणेदार रमेश जाधवर यांच्या मार्गदर्शनाखाली जमादार संतोष कोंडापेल्लीवार पुढील तपास करीत आहेत. दोन्ही मृतांचे शवविच्छेदन दहेली तांडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दुपारी १२.३० वाजता करण्यात आले. शवविच्छेदन उमरी बाजार येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. पुरुषोत्तम आईटवार यांनी केले असून, वैद्यकीय अधिकारी ओमप्रकाश थोटे यांनी सहकार्य केले.

शवविच्छेदनानंतर दोन्ही पार्थिव नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले. मृत विक्रम मारशेटवार यांच्या पश्चात आई व दोन भाऊ असा परिवार आहे. आत्महत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, मृताची पत्नी सध्या माहेरी राहत असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.या दुर्दैवी घटनेमुळे दहेली व परिसरात शोककळा पसरली असून, दोन वर्षांच्या चिमुकल्यासह पित्याने टोकाचा निर्णय घेतल्याने हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.



## मुख्य निवडणूक निरीक्षका नतिशा माथूर यांनी घेतला सिडको परिसरातील मतदान केंद्राचा आढावा

नवीन नांदेड ।प्रतिनिधी

नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका सार्वत्रिक निवडणूकी साठी १५ जानेवारीला मतदान होणार आहे त्याअनुषंगाने मुख्य निवडणूक निरीक्षक नतिशा माथूर व उपयुक्त गिरीश कदम यांनी सोमवारी सिडको परिसरातील विविध मतदान केंद्राना भेट देऊन पाहणी करून आढावा घेतला.

मुख्य निवडणूक निरीक्षक नितीशा माथुर यांनी निवडणूक प्रक्रिया सुरळीत व काटेकोर पध्दतीने पार पाडण्यासाठी त्यांनी सिडको क्षेत्रीय कार्यालय ६ अंतर्गत असलेल्या मतदान केंद्र शिवाजी विद्यालय सिडको व कसुमताई महाविद्यालय सिडको येथे पहाणी केली , यावेळी अधिकारी व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले.

## शिवसेनेचे माजी संघटक मारोती घुमाळ काँग्रेसचे सरचिटणीस नारायण लुटे भाजपा पक्षात प्रवेश

नवीन नांदेड - असरजन येथील शिवसेनेचे माजी संघटक पदाधिकारी मारोती धुमाळ व काँग्रेस आय पक्षाचे सरचिटणीस नारायण लुटे यांनी माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या उपस्थितीत भाजपा पक्षात प्रवेश केला .मनपा प्रभाग क्रमांक १९ मधील भाजपा पक्षाच्या उमेदवारांचा प्रचारासाठी ६ जानेवारी रोजी माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांनी असरजन येथे बैठकीसाठी आले असता माजी जिल्हा परिषद सदस्य मनोहर पाटील शिंदे,माजी नगरसेवक राजू पाटील काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेनेचे मारोती घुमाळ यांच्या सह नारायण लुटे यांनी भाजपा पक्षात प्रवेश केला यावेळी त्यांचे स्वागत करण्यात आले.जुना कौठा,असरजन,धुमाळवाडी येथे खासदार अशोकराव चव्हाण यांच्या उपस्थितीत बैठका घेण्यात आल्या यावेळी विविध ठिकाणी भव्य स्वागत करण्यात आले.

# कंधारच्या उरुसात राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन

## संदल मिरवणुकीत हजारो हिंदू-मुस्लिम बांधव सहभागी

कंधार(प्रतिनिधी)

शहरातील हिंदू-मुस्लिम एकतेचे प्रतीक असलेल्या प्रसिद्ध सूफी संत हजरत हाजी सय्याह सरवरे मगदूम सय्यद सईदोद्दिन रफाई रहेमतुल्ला अलय यांच्या ७११ व्या उरुसानिमित्त मंगळवारी सायंकाळी काढण्यात आलेल्या संदल मिरवणुकीत हजारो हिंदू-मुस्लिम बांधवांनी सहभाग घेत राष्ट्रीय एकतेचे दर्शन घडविले.

हजरत हाजी सय्याह यांचा दर्गा एक जाज्वल्य देवस्थान म्हणून प्रसिद्ध आहे. उरुसानिमित दर्गाच्या दर्शनासाठी हजारो भाविक-भक्त कंधारला हजेरी लावतात. जिल्हाधिकाऱ्यांकडून सुटी जाहीर करण्यात येत असल्याने उरुसाला भक्तांची मोठ्या प्रमाणात गर्दी होते. महाराष्ट्रासह शेजारील आंध्र, कर्नाटक, तेलंगणातही हाजी सय्याह यांना मानणारा वर्ग असल्यामुळे तेथील भाविक भक्तही उरुसाला दर्गामध्ये येऊन श्रद्धासुमने वाहतात.

मंगळवारी सायंकाळी पाचला फातेहाखाणीनंतर सज्जादा नशीन सय्यद शाह मूर्तुजा मोहियोद्दिन हुसैनी व मुतवली सय्यद शाह मुजतबा मोहियोद्दिन हुसैनी यांच्या मार्गदर्शनाखाली व उरूस समितीचे अध्यक्ष जफरोद्दिन बाहोद्दिन यांच्या नेतृत्वाखाली दर्गामधून संदल मिरवणुकीस प्रारंभ करण्यात आला. वाजतगाजत ढोल-ताशांच्या गजरात ही मिरवणूक भाविक भक्तांसह मार्गस्थ झाली.

शहरातील मुख्य मार्गावरून मार्गस्थ होत भाविक-भक्तांना दर्शन देत मिरवणूक रात्री उशिरा दर्गा येथे पोचली. मिरवणूक शांततेत पार पाडण्यासाठी पोलिस निरीक्षक चंद्रकांत जाधव यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. दरम्यान नगराध्यक्ष शहाजी नळगे, जफरोद्दीन बाहोदिन,रामराव पवार, प्रा. डॉ. पुरुषोत्तम धोंडगे, दिलीप धोंडगे, सुधाकर कांबळे, राम बनसोडे, केशव जाधव, स्वप्निल लुंगारे,मधुकर डांगे,गंगाधर कांबळे भास्कर नळगे,सुहास कांबळे,समीर चाऊस, जीवन लुंगारे, सतीश देवकत्ते, मन्नान चौधरी, हमीद सुलेमान,सय्यद अमजद, शहरातील आजी माजी नगरसेवक यांच्यासह आदींनी उपस्थिती लावून दर्शन घेतले.

